follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासार्हतेची

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd. No. 72105/99 ⁘ वर्ष २५ ⁘ अंक २१३ ⁘ सातारा ⁘ गुरुवार, दि. ११ एप्रिल २०२४ ⁘ पाने ४ (सुप्रभात) ⁘ किंमत ५/– रूपये

### नजरकैदेत ठेवण्याची मागणी गौतम नवलखांना पडली भारी; एनआयएनं दिलं १.६४ कोटींचे बिल

**पुणे :** येथे २०२८ साली एल्गार परिषदेच्या आयोजनात माओवाद्यांचा संबंध आल्याबद्दल राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) काही लोकांना अटक केली होती. गौतम नवलखा यांनाही या प्रकरणी अटक झाली होती. त्यानंतर नवलखा यांच्या मागणीनुसार त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले होते. आता या नजरकैदेसाठी जी सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात आली होती, (पान ३ वर)

# शेतकरी आणि मराठा समाजाच्या आक्रमकतेपुढे पालकमंत्री चंद्रकात पाटलांनी भाषण गुंडाळले

## खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर, आ. बबनदादा शिंदे, आ. संजयमामा शिंदे, प्रशांत परिचारक, दीपक साळुंके यांच्यासमोरच झाला गोंधळ

**माढा/प्रतिनिधी**

**माढ्यातील टेभुर्णी येथे भाजपा उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ महायुतीतील घटक पक्षाच्या बैठकीत चंद्रकात पाटील यांच्यासमोर संतप्त शेतकऱ्याने शतावरी पिकाचे पैसे मिळत नसल्याबाबत प्रश्न विचारताच एकच गोंधळ उडाला. यामुळे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना आपले भाषण अर्ध्यावर सोडून बैठक गुंडाळावी लागल्याची घटना माढा मतदारसंघातील टेंभुर्णी येथील रामकृष्ण मंगल कार्यालय येथे बुधवारी घडली.**



याबाबत अधिक माहिती अशी की, माढा लोकसभा मतदारसंघ घटक पक्ष निवडणूक नियोजन बैठक पदाधिकारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठक अंतीम टप्प्यात आले असताना पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी कार्यकर्त्यांना प्रश्न विचारताना सुरली ता.माढा येथील शेतकरी संपतराव अनंता काळे याने मागील काही वर्षांपूर्वी माजी केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांनी करमाळा तालुक्यातील कंदर येथे आयुष्य मंत्रालयाचे वतीने कार्यक्रम आयोजित करून शतावरी पिकाची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करून अनेक शेतकऱ्यांना ते पिक अनेक शेतक-यांनी जोपासून ती पिके सदर कंपनीला विकली होती परंतु त्याचे पैसे कोणत्याही शेतक-याला मिळाले नाहीत,

यामध्ये सदर शेतकऱ्यांचे २२ लाख अडकले आहेत याविषयी खासदार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर निंबाळकर यांना चार ते पाच वेळा समक्ष भेटून व्यथा माडून त्याचेकडून कुठलेही अश्वासन अथवा पैसे मिळावे यासाठी काहिच प्रयत्न केले नसल्याने सदर शेतकऱ्याने आक्रमक पणे पालकमंत्री चंद्रकात दादा पाटील यांनाच याच वेळी एकाने मराठा आरक्षणासंदर्भात प्रश्न विचारले असता दादांनी तुम्ही कोणत्या पक्षाकडून आहात असे विचारले व भाजपाला प्रत्येक बुथमध्ये ५०० मतापैकी ३७० मते मिळतील व तुमच्यासारखी १३० मते आम्ही सोडून देतो असे म्हणताच एकच गोंधळ उडाल्याने शेतकरी काळे यांना पोलिसांनी व कार्यकर्त्यांनी बाहेर ढकलण्याचा प्रयत्न केला परंतु अनेकांनी शेतकऱ्यांना बोलू द्या त्याचे मत मांडू द्या अशी भूमिका घेतली. तोपर्यंत बैठक गुंडाळावी लागली.

या बैठकीसाठी पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, बबनदादा शिंदे, संजय मामा शिंदे, पाटील चेतनसिंग केदार, दीपक साळुंखे पाटील, प्रशांत परिचारक, राजकुमार पाटील, शितोळे, संजय पाटील-भिमानगरकर, बंडुनाना ढवळे-पाटील, सुहास पाटील, शिवाजीराव पाटील-चांदजकर, वैभव मोरे, दिपक पाटील, उमेश पाटील, रामभाऊ शिंदे, अ ॲड धनश्रीताई खटके, सविता जगताप, माया माने, अनिता लोंढे, योगेश बोबडे, जयसिंग ढवळे आदि उपस्थित होते.

# राष्ट्रवादीचे साताऱ्यात १५ रोजी शक्तीप्रदर्शनं

### शरद पवार यांच्या उपस्थितीत शशिकांत शिंदे भरणार अर्ज



**राजदंड / सातारा**

सातारा लोकसभेच्या निवडणुकीसाठी 'इंडिया' आघाडीतील सर्व पक्ष एकत्र आले असून, कऱ्हाड, पाटणसह सर्व सहा विधानसभा मतदारसंघातील इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांचे संघटन मजबूत करणार आहे. आघाडीतून आमदार शशिकांत शिंदे यांच्या उमेदवारीसाठी अधिकृत घोषणा झाली असून, दि. १५ एप्रिल रोजी खासदार शरद पवार यांच्या उपस्थितीत अर्ज भरण्यात येणार असल्याची माहिती आमदार बाळासाहेब पाटील यांनी दिली.

सातारा येथे राष्ट्रवादी भवनात इंडिया आघाडीची बैठक झाली. यावेळी आमदार बाळासाहेब पाटील, काँग्रेसचे जल्हिाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, तसेच श्रमिक मुक्ती दलाचे नेते डॉ. भारत पाटणकर यांनी माध्यमांशी संवाद साधला.

इंडिया आघाडीसमोर खासदार उदयनराजे यांचे आव्हान असल्याचे छेडले असता बाळासाहेब पाटील म्हणाले, या निवडणुका विचारावर आधारित लढल्या जाणार आहेत. कऱ्हाड, पाटणमध्ये जवळपास ५५ टक्के मतदार आहेत; परंतु या तन्हीी मतदारसंघांबरोबरच इतर विधानसभा मतदारसंघातही मतदार मोठ्या संख्येने आहेत. या सर्व ठिकाणी कार्यकर्त्यांचे संघटन केले जाईल. पक्ष जो उमेदवार देईल त्याच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय इंडिया आघाडीतील नेत्यांनी केला आहे. इंडिया आघाडीचा जाहीरनामा आहे. याशिवाय जिल्ह्याचे इतर प्रश्न मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले. देशामध्ये दुष्काळी परस्थिती आहे. प्रशासन कोणतीही हालचाल करत नाही. सत्ताधाऱ्यांत ताळमेळ नाही. मोठमोठ्या सभा घेत आहेत. परंतु, शेतकरी, कष्टकरी अडचणीत आहेत, त्यासाठी काहीच करत नसल्याचा (पान ३ वर)

**बंगळुरू बॉम्बस्फोट प्रकरण**

## छत्रपती संभाजीनगरातील तीन तरुणांची एनआयएकडून चौकशी

**छत्रपती संभाजीनगर :** बंगळुरूच्या रामेश्वरम कॅफ बॉम्बस्फोटातील दोन मुख्य संशयितांच्या संपर्कात शहरातील तीन तरुण असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे या प्रकरणी एनआयएकडून छत्रपती संभाजीनगरातील तीन तरुणांची चौकशी केल्याची माहिती सूत्रांनी दिली. एनआयए आणि दिल्ली पोलिसांच्या पथकानं हर्सूल परिसरातील या तरुणांची कसून चौकशी केली. त्यात त्यांच्या घराची झाडाझडती घेऊन लॅपटॉप, मोबाईलसह ते वापरत असलेले अन्य इलेक्ट्रॉनिक साहित्य जप्त केल्याची प्राथमिक माहिती सूत्रांकडून देण्यात आली.

बॉम्बस्फोटातील आरोपीच्या होते संपर्कात? : १ मार्चला बंगळुरू येथील रामेश्वर कॅफे इथं बॉम्बस्फोट (पान ३ वर)

# धैर्यशील मोहिते पाटील १३ एप्रिलला शरद पवार गटात करणार प्रवेश

**राजदंड / पुणे**

भाजपाचे नेते धैर्यशील मोहिते हे महायुतीकडून माढा लोकसभा निवडणूक लढण्यासाठी इच्छुक होते. पण भाजपानं विद्यमान खासदार रणजीतसिंह निंबाळकर यांना उमेदवारी दिल्यानं फलटण आणि माढा या दोन ठिकाणी मोठी नाराजी पसरली आहे. त्यामुळे मोहिते पाटील आणि निंबाळकर घराण्यानं बैठकी सुद्धा घेतल्या. पण प्रवेश हा कुठे घ्यायचा यासाठी ते कार्यकर्त्यांशी बातचीत करत होते. अखेर धैर्यशील मोहिते हे १३ एप्रिलला शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सोलापूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार आहेत.

माढामधील तिकीट वाटपावरून महायुतीमधील मोहिते पाटील घराणं आणि दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटातील निंबाळकर घराणे नाराज आहेत. तिढा सुटला नसताना आपल्याला संधी नाही तर आपण तुतारी हातात घ्यावी, अशी कार्यकर्त्यांची इच्छा असल्यास धैर्यशील मोहिते पाटीलसुद्धा म्हणत होते. परंतु विजयसिंह मोहिते पाटलांचे बंधू पुत्र रणजीत मोहिते पाटील विधानपरिषद सदस्य म्हणून भाजपामध्ये आहेत. त्यामुळे धैर्यशील मोहिते पाटील यांना निर्णय घेण्यास वेळ लागल्याचं सूत्रानं सांगितलं.



माढा लोकसभेची जागा शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून जाहीर करण्यात आली नव्हती. वेट अँड वॉची भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसकडून घेण्यात आली होती. परंतु धैर्यशील मोहिते यांचा पक्ष प्रवेश निश्चित झालेला आहे. त्यांना माढा येथून उमेदवारीसुद्धा मिळू शकते. त्याचबरोबर आता निंबाळकर घराणं काय भूमिका घेतं? गणपत देशमुख यांचे नातू अनिकेत देशमुख काय भूमिका घेतात? या सगळ्याचीसुद्धा आता चाचणी केली जात आहे. काही दिवसापूर्वीच शरद पवार यांनी सांगितलं होतं की, आम्ही निंबाळकर आणि मोहिते या दोघांना आपसात बसून कुणाला उमेदवारी द्यायचे हे ठरवा. अगोदर पक्ष प्रवेश करूनच उमेदवारी द्यायची, यावर शरद पवार ठाम होते. त्यामुळे शरद पवारांनी माढा मतदारसंघाचे तिकीट वाटप न करण्याचं खरं कारण समोर आले आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील मोठी मोहिते पाटील आणि निंबाळकर हे वजनदार घराणे आहेत. त्यांचे मोठ्या प्रमाणात सोलापूर आणि माढामध्ये वर्चस्व आहे. त्याचा फायदा शरद पवार यांच्या पक्षालासुद्धा मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. धैर्यशील मोहिते पाटील यांच्या नाराजीवर मार्ग काढण्याचा देवेंद्र फडवणीस अखेरपर्यंत मार्ग काढत होते. मात्र, त्यांना यश आलं नसल्याचं दिसत आहे. धैर्यशील मोहिते पाटील अकलुजमधील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुलात शरद पवार गटात प्रवेश करणार आहेत. (पान ३ वर)

# मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारात 'होम मिनिस्टर'ही सक्रिय!

- मोनिका मोहोळ यांचा पहिल्या दिवसापासूनच सहभाग
- ६ विधानसभा मतदारसंघातील भेटीगाठींचा टप्पा पूर्ण

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांच्या निवडीची प्रक्रिया सर्वात अगोदर सुरू केली. पक्षाच्या दुसऱ्याच यादीत दि. १३ मार्चला पुणे लोकसभा मतदार संघातून पक्षाने मुरलीधर मोहोळ याचे नाव जाहीर केले. नावाची घोषणा झाल्यानंतर मोहोळ यांनी ग्रामदेवतांच्या दर्शनाने आपल्या प्रचाराला सुरूवात केली. या देवदर्शनापासूनच मोहोळ यांच्या पत्नी आणि माजी नगरसेविका मोनिका मोहोळ यांनी निवडणुकीच्या रणधुमाळीत आपण सक्रिय होत असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी पक्षातील महिला कार्यकर्त्या आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या साथीने भेटीगाठी सुरू केल्या. त्यामुळे सुरूवातीपासूनच मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचाराच्या एका बाजूची धुरा होम मिनिस्टरनी सांभाळले असल्याचे अधोरेखीत झाले आहे.

भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस-रिपब्लीकन पक्ष (आठवले गट) व मित्र पक्षांच्या महायुतीचे पुण्यातील उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ मोनिका मोहोळ यांनी शहरातील सहाही विधानसभा मतदारसंघातील मान्यवर, 



आजीमाजी नगरसेवकांच्या घरी जाऊन त्यांच्या भेटीगाठी घेण्यास सुरूवात केली. गेल्या पंधरा दिवसात त्यांनी मतदारसंघात अनेकांच्या भेटीगाठी घेतल्या. या भेटीगाठी दरम्यान शक्य झाले तिथे त्या स्थानिक कार्यकर्त्यांच्याही घरी जाऊन त्यांना भेटत आहेत. निवडणूक प्रचार याबद्दल कार्यकर्त्यांची मत त्यांनी जाणून घेतली. सध्याचा वाढता उन्हाळा बघून त्या कार्यकर्त्यांना उन्हापासून बचाव करत प्रचार आणि पक्षाचे काम करा. आपल्याला १३ मेपर्यंत ही लढाई लढायची असल्याने आपण आजारपणामुळे प्रचारापासून दुर रहाणार नाही याची काळजी घ्या, काही मदत लागली तर सांगा असे आवर्जून सांगत होत्या.

या आपल्या पहिल्या प्रचार फेरीबद्दल मोनिका मोहोळ यांनी सांगितले की, 'मी महापालिकेत नगरसेविका म्हणून काम केले आहे. यात महापालिकेत अनेक सहकारी नगरसेवकांशी नव्याने ओळख झाल्या, मैत्रीही झाली. या पाच वर्षात मला समाजकारण आणि लोकांची कामे करण्याचे स्वातंत्र्य देत मुरलीधरआण्णांनी मला एकप्रकारे प्रशिक्षणच दिलं आहे. लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रचारात पुढे कधीतरी सहभागी व्हावेच लागणार होते, मग सुरूवातीपासूनच का आपण यात सहभागी होऊ नये ! म्हणून या अनुभवाच्या जोरावरच मी सुरूवातीपासूनच प्रचारात सक्रिय होण्याचे ठरवले आणि त्याप्रमाणे स्वतंत्रपणे भेटीगाठी घेतल्या.

'मला जवळपास पाच निवडणुकींचा अनुभव असून तो अनुभव आज महत्त्वाचा ठरत आहे. भेटीगाठींमधून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जनसामान्यांच्या विश्वासाची साक्ष पदोपदी (पान ३ वर)

### स्पा सेंटरवर पोलिसांचा छापा; आठ महिलांची सुटका

**पिंपरी :** चिंचवड शहरातील आयटी हब हिंजवडी आणि उच्चभ्रू असलेल्या वाकड परिसरात गेल्या तीन दिवसांपासून स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणाऱ्या चालक, मालकांवर गुन्हा दाखल करत आठ महिलांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाला यश आल आहे. यावर्षी आत्तापर्यत पिटा अंतर्गत ३१ गुन्हे दाखल करण्यात आले असून ३२ पीडित महिलांची सुटका केल्याची कामगिरी केली आहे. तर, ४५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वडगाव येथील चिमुकल्याचा तळ्यात बुडून मृत्यू

**राजदंड / वडगाव मावळ**



वडगाव मावळ येथील पोटोबा मंदिर परिसरात असलेल्या पाण्याच्या तळ्यात बूडून एका आठ वर्षीय चिमुकल्यांचा मृत्यू झाला हि घटना सोमवारी (दि ८) सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली.

समर बाळू कराळे (वय ८ वर्षे, रा.वडगाव मावळ ) असे मृत बालकाचे नाव असून त्याच्या मृत्यूमुळे शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

वडगाव मावळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुमार कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार, समर हा रविवारी (दि ७) दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास अंगणात खेळत असताना बेपत्ता झाला होता. त्याचा सर्वत्र शोध घेण्यात आला. मात्र, तो सापडला नव्हता. त्यामुळे, त्याची आजी सुनीता दत्तात्रेय सुपेकर यांनी वडगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. शोध सुरू असतानाच त्याचा मृतदेह सोमवार( ८ सायंकाळी ५ :३० वाजण्याच्या सुमारास पोटोबा महाराज मंदिरा मागील बाजूस असलेल्या तळ्यात आढळून आला. मृतदेह तळेगाव येथे शवविच्छेदन केल्यानंतर नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

समर हा वडगाव येथे त्याच्या आजी आजोबांकडे रहात होता. तो वडगाव येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता तिसरीमध्ये शिकत होता. त्याच्या दुर्दैवी मृत्यूमुळे वडगाव शहरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ऋतुजा मोहिते करत आहेत.

### सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

**वडगाव नगरपंचायत हद्दीतील या ऐतिहासिक तळ्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली आहे सुरक्षा रक्षक भिंतीची पडतड झाली आहे नगरपंचायतीच्या हलगर्जीपणामुळे हि दुदैवी घटना घडली असल्याचा आरोप मनसे तालुकाध्यक्ष रुपेश म्हाळसकर यांनी केला आहे. या दुर्दैवी घटनेला नगरपंचायत प्रशासन मागील सत्ताधारी जो कोणी जबाबदार असेल त्याच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी मनसेचे तालुकाध्यक्ष रुपेश म्हाळसकर, भाजपाचे शहराध्यक्ष संभाजी म्हाळसकर, तसेच अनंता कुडे यांनी केली आहे.**

'पिझोइलेक्ट्रिक बोन कंडक्शन श्रवण प्रत्यारोपण यशस्वीरित्या करणारे

# पुण्यातील कमांड रुग्णालय ठरले देशातील पहिले सरकारी रुग्णालय

**राजदंड / पुणे**

पुण्याच्या कमांड रुग्णालयाच्या (सदर्न कमांड) कान, नाक आणि घसा विभागाने जन्मजात बाह्य आणि कानाच्या आतील विसंगतींनी ग्रस्त आणि मोठ्या प्रमाणावर श्रवणशक्ती कमी झालेल्या ७ वर्षाच्या मुलामध्ये तसेच एकाच कानाने बहिरेपण असलेल्या एका प्रौढ व्यक्तीवर यशस्वी पिझोइलेक्ट्रिक बोन कंडक्शन श्रवण प्रत्यारोपण केले आणि अशाप्रकारचे प्रत्यारोपण करणारे हे रुग्णालय देशभरातील पहिले सरकारी रुग्णालय बनले आहे.

कमांड रुग्णालयाचा (सदर्न कमांड) विभाग हे न्यूरोटोलॉजी केंद्र आहे. हा विभाग अनेक वर्षापासून अवलंबित्व असलेल्या ग्राहकांना श्रवणयंत्र बसवत आहे. ॲक्टिव्ह पिझोइलेक्ट्रिक बोन कंडक्शन हियरिंग इम्प्लांट सिस्टीम हे श्रवणदोष असलेल्या रूग्णांसाठी (कंडक्टिव्ह लॉस (ऑरल एट्रेसिया), दोन्ही कानाने किंवा एका कानाने बहिरेपणा) प्रत्यारोपण करण्यायोग्य वैद्यकीय इलेक्ट्रॉनिक उपकरण आहे. उपकरणांची किंमत नेहमीच चिंतेची बाब राहिली आहे, ज्यामुळे त्याचा वापर मर्यादित स्वरूपात होतो.



कंडक्टिव्ह (ध्वनिलहरी कर्णपटलापर्यंत न पोहोचणे) दोन्ही कानाने किंवा एका कानाने बहिरेपणा असलेले असे रुग्णांचे प्रकार आहेत, ज्यांना प्रत्यारोपण किंवा श्रवणयंत्र किंवा कानातील शस्त्रक्रियेने फायदा होत नाही. संबंधित अपंगत्व कमी करण्यासाठी, मुलांमध्ये चांगल्या शैक्षणिक परिणामासाठी आणि प्रौढांमधील सामाजिक जीवनासाठी श्रवणवृद्धी प्रदान करणे अत्यावश्यक आहे. रुग्णांच्या अशा गटांमध्ये त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी बोन कंडक्शन रोपण हा निश्चित श्रवण उपाय आहे आणि सशस्त्र दलाच्या वैद्यकीय सेवांनी हे त्वरित अंमलात आणले.

सशस्त्र दलाच्या वैद्यकीय सेवेचे महासंचालक जनरल दलजीत सिंग आणि डीजीएमएस (लष्कर) लेफ्टनंट जनरल अरिंदम चटर्जी यांनी कमांड रुग्णालयाचे (एससी) अभिनंदन केले आहे आणि संस्थेला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

कर्नल (डॉ) राहुल कुरकुरे, न्यूरोटोलॉजिस्ट आणि इम्प्लांट सर्जन कर्नल (डॉ) नितू सिंग, वरिष्ठ सल्लागार आणि एचओडी (ईएनटी) यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्याच्या कमांड रुग्णालयात (एण)या रूग्णांवर यशस्वी रोपण करण्यात आले. पुण्याचे कमांड रुग्णालय (एण), हे अइशए च्या प्रमुख संस्थांपैकी एक आहे, सध्या मेजर जनरल बी नांबियार यांच्या नेतृत्वाखाली आहे. संपूर्ण अइशए मधील सर्वोत्कृष्ट रुग्णालय म्हणून रुग्णालयाला नुकतेच सर्वात प्रतिष्ठित ''रक्षा मंत्री'' चषकाने सन्मानित करण्यात आले.

## स्थित्यंतर

राही भिडे
९८६७५२१०४९



# भाजपा पॉवरफूल, मुख्यमंत्र्यांवर नामुष्की!

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत आपली कुचंबणा होत असल्याचा आरोप ठेवून भाजप सोबत जाण्याचा निर्णय घेतला, मुख्यमंत्रिपद मिळवले. शिवसेनेत बंड घडवून आणले; परंतु शिंदे यांना अवघ्या दोन वर्षांत भाजपच्या रणनीतीचा अनुभव आला आहे. महाविकास आघाडीत राहून शिवसेनेचे जेवढे खच्चीकरण झाले नसते, त्याहून अधिक खच्चीकरण आता भाजपकडून सुरू असल्याची चर्चा होत आहे. राज्यातील ट्रिपल इंजिन सरकारमध्ये एक भाजपच पॉवरफूल आहे; परंतु शिंदे - शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन इंजिनांना ते ना धड धावू देत, ना मागे राहू देत. या दोन्ही इंजिनांचे ब्रेक आणि गिअरही भाजपच्या हाती आहेत. त्यात मुख्यमंत्री शिंदे यांच्या स्वभावाचा गैरफायदा घेत शिंदे यांना लोकसभा निवडणुकीत आपल्या तालावर नाचायला भाजपने भाग पाडले आहे. वेगवेगळ्या सर्वे क्षणाच्या नावाखाली उमेदवार बदलायला भाग पाडले, तर काही ठिकाणी मतदारसंघच बदलायला भाग पाडले. पक्ष शिंदेंचा; परंतु मतदारसंघ आणि उमेदवार ठरवणार भाजप. लोकशाहीची ही नवी पद्धत आता सुरू झालेली दिसते. त्या तुलनेत अजित पवार सौदेबाजीत हुशार म्हणायचे. त्यांचा एक मतदारसंघ सोडावा लागला, तरी त्यांनी दोन मतदारसंघ पदरात पाडून घेतले. गेल्या वेळच्या लोकसभा निवडणुकीतील सुनील तटकरे हे एकमेव खासदार त्यांच्याकडे होते; परंतु त्यांनी रायगडबरोबर बारामती, शिरूर, नाशिक, परभणी आणि धाराशिव हे सहा लोकसभा मतदारसंघ पदरात पाडून घेतले. त्यांचा रुसवा-फुगवा कामाला आलेला दिसतो. त्यांचा एकही उमेदवार भाजपने सुचवला नाही. उलट, शिवसेनेच्या शिंदे भाजप पॉवरफूल, मुख्यमंत्र्यांवर नामुष्की ! गटात आणि भाजपत गेलेल्यांना राष्ट्रवादीत आणून त्यांनी उमेदवारी दिल्या. त्यात डॉ. अर्चना पाटील यांना फक्त भाजपच्या सूचनेप्रमाणे उमेदवारी दिली. महादेव जानकर यांना राष्ट्रवादीचा परभणीचा मतदारसंघ सोडून अजितदादांनी बारामतीसाठी बेगमी केली तर मावळ, कल्याण आणि जळगाव येथे शिंदेसेना आणि भाजपचे नाक दाबले आणि बारामतीचा कोंडलेला श्वास मोकळा झाला. याउलट शिंदे गटाची गत झाली. गेल्यावेळी १८ खासदार निवडून आले होते. त्यापैकी १३ खासदार शिंदे यांच्यासोबत असतानाही त्या जागा टिकविता येतील की नाही, अशी शिंदे गटाची स्थिती आहे. रामटेकमधील कृपाल तुमाने यांचे तिकीट कापून काँग्रेसमधून आ. राजू पारवे यांना शिंदे गटात प्रवेश करायला लावून त्यांना उमेदवारी द्यायला भाजपने भाग पाडले. हिंगोलीत हेमंत पाटील यांची जाहीर झालेली उमेदवारी बदलायला लावली. तिथे वेगळा उमेदवार दिला असला, तरी भाजपच्या आमदाराने तिथे बंड केले आहे. महाराष्ट्रात ४८ लोकसभा मतदारसंघांपैकी ४५ जागांवर विजय मिळवण्याचे लक्ष्य गाठताना भाजपने स्वत:कडचा एकही मतदारसंघ सोडला नाही. उलट, अजितदादांकडचा सातारा मतदारसंघ, शिंदे गटाचे पालघर, अमरावती, सिंधुदुर्ग आदी मतदारसंघ स्वत:कडे घेतले आणि शिंदे गटाचे नाशिक, धाराशिव, परभणी हे तीन मतदारसंघ अजितदादा गटाला द्यायला भाग पाडले. स्वत:चे ताट भरताना मित्राच्या ताटातले काढून घेण्याची राजकीय संस्कृती भाजपने रुजवली आहे. आणखी एका मित्राच्या ताटात चतकोर टाकताना स्वत:चे ताट सुरक्षित ठेवून पहिल्याच मित्राच्या ताटात हात घातला. महायुतीतल्या चार मतदारसंघांवर तीनही पक्षांकडून दावे केले जात होते; पण राज्याच्या नेत्यांनी एकत्रितपणे इथे उमेदवार कोण यावर तोडगा काढला असला, तरी स्थानिक पातळीवर अजूनही कलह सुरू आहे. अमरावतीमध्ये नवनीत राणांच्या उमेदवारीला स्थानिक नेत्यांकडून प्रचंड विरोध होता; पणतरीही भाजपकडून राणा यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली. शिंदे गटाचे आनंदराव आडसूळ, अभिजीत आडसूळ, 'प्रहार' संघटनेचे बच्चू कडू आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय खोडके यांचा विरोध डावलून राणा यांना उमेदवारी दिल्याने आता महायुतीत महाकलह सुरू झाला आहे. आमदार रवी राणा यांनी बच्चू कडू शिंदेंच्या शिवसेनेत गेल्यानंतर त्यांच्यावर काही आरोपही केले होते. विविध कामांवरून दोन नेत्यांमध्ये श्रेयवादाचा संघर्ष पाहायला मिळाला होता. आ. कडू यांनी सध्या 'आम्ही बुडलो तरी चालेल, पण स्वाभिमान गेला नाही पाहिजे, अशी भूमिका घेतली आहे.

भाजप नेते आणिमाजी मंत्री प्रवीण पोटे अमरावतीचे पालकमंत्री असताना अनेक स्थानिक कामांवरून रवी राणा आणि पोटे यांच्यात वाद झाले होते तेव्हा राणा यांनी पोटे यांना 'बालकमंत्री' म्हटले होते. कल्याण हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव डॉ. श्रीकांत यांचा मतदारसंघ, त्यांचे नाव सर्वांत अगोदर जाहीर व्हायला हवे होते; परंतु कल्याण आणि ठाणे मतदारसंघावर भाजपने दावा केल्याने शिंदे यांची गोची झाली आहे.

कल्याण लोकसभा मतदारसंघाने गेली अनेक वर्ष हिंदुत्ववादी पक्षाला निवडून दिले आहे. १९९६ पासून हा मतदारसंघ शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला होता; परंतु त्याअगोदर तो भाजपचा बालेकिल्ला होता. ठाणे जिल्हा हे शिंदे यांचे होमग्राऊंड असताना या मतदारसंघावर भाजपने दावा केला आहे. आता हे दोन्ही मतदारसंघ शिंदे यांच्याकडे ठेवायचे असतील, तर त्या बदल्यात छत्रपती संभाजीनगर, सिंधुदुर्ग, पालघर या तीन मतदारसंघावर भाजपने दावा केला आहे. त्यात पालघर लोकसभा मतदारसंघ भाजप स्वत:कडे घेत असताना शिंदे गटाचे खासदारही स्वत:च्या पक्षात घेत आहे. कल्याणमध्ये भाजप कार्यकर्ते आणि आमदारांकडून श्रीकांत शिंदे यांच्याबाबत उघडपणे नाराजी व्यक्त करण्यात आली. लोकसभेची जागा जरी शिवसेनेची असली तरी ती भाजपच्या मदतीने निवडून येत असल्याचे काही नेत्यांकडून बोलले गेले. काही दिवसांपूर्वी भाजपचे आमदार गणपत गायकवाड यांनी पोलीस ठाण्यात शिवसेनेचा शिंदे गटाचा पदाधिकारी महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला. या घटनेनंतर त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केले आणि शिंदे कुटुंबीयांवर उघड नाराजी व्यक्त केली. हिंगोलीत उमेदवारी बदलल्याने शिंदे गटाने नांदेडमध्ये भाजपला धडा शिकवण्याचा इशारा दिला आहे. पाटील यांच्या पत्नी राजश्री यांना त्यांच्या माहेरच्या वाशिम यवतमाळमधून उमेदवारी दिली असली, तरी तिथे भावना गवळी यांनी बंडाचे निशाण फडकवले आहे. हातकणंगलेमधून धनंजय माने यांची उमेदवारी शिंदे यांनी जाहीर केली; परंतु सर्वे क्षणाचे कारण सांगून त्यांची उमेदवारीही बदलली जाण्याची शक्यता आहे. त्यांच्याऐवजी त्यांच्या मातोश्री निवेदिता माने यांना उमेदवारी देण्याचे घाटत आहे. तिकडे सिंधुदुर्ग-रत्नागिरीतून निवडणूक लढवण्यास सुरुवातीला नकार देणारे नारायण राणे यांनी आता मैदानात उतरण्याचे मान्य केले आहे. या मतदारसंघातून गेल्या दोन वर्षांपासून तयारी करणारे किरण सामंत यांच्या मनसुब्यावर त्यामुळे पाणी फेरले आहे.

पालघरपासून रत्नागिरी - सिंधुदुर्गपर्यंतच्या मतदारसंघात शिंदे गटाच्या वाट्याला जास्तीत जास्त चार मतदारसंघ येऊ शकतात, अशी स्थिती आहे. नाशिक लोकसभा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेसच्या छगन भुजबळ यांच्यासाठी सोडण्याचा भाजपचा दबाव असून त्यामुळे खा. हेमतं गोडसे व त्यांचे समर्थक नाराज आहेत. लोकसभेला ही स्थिती असेल, तर विधानसभेला काय होईल, असा भीतीचा गोळा शिंदे गटाच्या पोटात आला आहे. दोन वर्षांपूर्वीच्या बंडाचे हेच काय फळ असे म्हणण्याची वेळ त्याच्यावर आली आहे.

# शिरूर लोकसभा मतदार संघाची निवडणूक आरोप प्रत्यारोपामुळे गाजू लागली

**मतदारसंघात कोणी किती कामे केली व किती वेळ दिला हाच निवडणुकीच्या प्रचाराचा प्रमुख मुद्दा ठरत आहे. माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हे आपण असलेल्या खासदारकीच्या काळात केलेली विकास कामे तसेच खासदार नसतानाही आपण ठेवलेला जनसंपर्क ही आपली जमेची बाजू असल्याचे सांगत आहे तर विद्यमान खासदार डॉक्टर अमोल कोल्हे आपण संसदेत शेतकऱ्यांच्या शेतमालाला बाजार भाव मिळावा तसेच बैलगाडा शर्यत मंजूर करण्यासाठी केलेले प्रयत्न, मंजूर झालेले राष्ट्रीय महामार्ग, हायस्पीड रेल्वे, याशिवाय विविध विकास कामांबद्दल संसदेत मांडलेले प्रश्न याचा लेखाजोखा जनतेसमोर मांडताना दिसत आहेत. महाविकास आघाडी व महायुती या दोघांनी विजयाचा दावा केला आहे यामुळे ही निवडणूक चुरशीची होणार हे मात्र नक्की !**

**नारायणगाव :** लोकसभा निवडणुकीला एक महिन्यांपेक्षा जास्त कालावधी असताना शिरूर लोकसभा मतदारसंघाचा निवडणुकीचा प्रचार आता शिगेला पोहोचत आहे. प्रत्यक्षात उमेदवारी अर्ज भरणे, उमेदवारी अर्जाची छाननी होणे, माघार घेणे या संपूर्ण प्रक्रियेला काहीसा अवधी आहे तरीही महा विकास आघाडी व महायुतीचे उमेदवार व त्यांचे प्रचार प्रमुख, पाठीराखे असलेले जबाबदार पक्षांचे नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी आता आरोप प्रत्यारोप करू लागले आहेत. याचाच भाग म्हणून की काय, दोन-तीन दिवसांपूर्वी जुन्नर तालुक्यात माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचाराच्या निमित्ताने जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागात जुन्नर चे आमदार अतुल बेनके यांनी विद्यमान खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांना निवडून देऊन आम्हाला पश्चातापाची वेळ आली आहे असे वादग्रस्त विधान केले होते.

या विधानावर खासदार डॉक्टर कोल्हे गप्प बसतील हे शक्य आहे का, म्हणूनच डॉ कोल्हे यांनी आज त्याच जुन्नरच्या पूर्व भागात झालेल्या मतदारांच्या गाठीभेटी वेळी आमदार अतुल बेनके यांना आज लक्ष केले. केवळ त्यांच्यावर टीका न करता त्यांनी केलेल्या पश्चातापाच्या आरोपावर जबरदस्त कुरघोडी केली आहे. खासदार डॉक्टर कोल्हे म्हणाले की, आमदार अतुल बेनके यांच्या सारखा घरात ४ दशके माझ्याकडे राजकीय वारसा असेल अशी परिस्थिती नव्हती.

आता तुम्ही लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रचारा निमित्त फार बोलत जरी असाल तर विधानसभेच्या निवडणुकीत गाठ माझ्याशीच आहे असे सांगून आमदार बेनके आपको करारा जवाब मिलेगा असे बोलून जणू इशाराच दिला आहे.

मग या विधानावर न बोलतील ते अतुल बेनके कसले...! त्यांनी देखील खासदार डॉक्टर कोल्हे यांच्यावर थेट निशाणा साधत तुम्ही पंतप्रधान मोदी साहेबांच्या पदराआड लपत होते. एवढेच नाही तर तुम्ही केंद्रीय गृहमंत्री व भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांच्याकडे देखील मला पक्षात घ्या म्हणून त्यांच्या भोवती पिंगा घातला होता अशी बोचरी टीका केली आहे. तुम्ही मतदार संघात कधी फिरलेच नाही तुम्ही ज्या गावात भाषणे केली तेथे तुम्ही कधीही आले नाही व तेथे एक रुपयाचा निधी देखील दिला नाही. अशी टीका आमदार बेनके यांनी केली आहे.

दरम्यान मागील विधानसभेला खासदार डॉक्टर कोल्हे यांनी आमदार अतुल बेनके यांच्या प्रचारार्थ मोठा संपर्क दौरा व प्रचार केला होता त्यामुळे येत्या काही दिवसात म्हणजेच सप्टेंबर किंवा ऑक्टोबर मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये देखील प्रचाराच्या दरम्यान मोठी रणधुमाळी पाहायला मिळणार आहे. तत्पूर्वी राष्ट्रवादीच्या अजित पवार गट व शरद पवार गट यामध्ये मोठ्या वादग्रस्त घटना व विधाने घडणार व ऐकायला मिळणार यात काही शंका वाटत नाही.

## हारुण पटवेगार - म्हतापे यांची प्रदेश उपाध्यक्षपदी निवड



**कुरुंदवाड :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या नुकताच पदाधिकारी निवडी पार पडल्या या निवडीमध्ये हारून पटवेगार-म्हतापे कुरुंदवाड यांची राष्ट्रवादी काँगेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अल्पसंख्याक विभाच्या महाराष्ट प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड झाली असून या निवडीचे पत्र महाराष्ट्र अध्यक्ष अल्पसंख्यांक विभाग जावेद हबीब यांच्या सहीने दिले आहे.. जिल्हाध्यक्ष व्ही बी पाटील यांचे मोलाचे सहकार्य व विशेष प्रयत्न राहिले.

यावेळी बोलताना पटवेगार म्हणाले पक्ष बळकटीसाठी व वाढीसाठी विशेष प्रयत्न करू शरद पवार यांचे ध्येय धोरणे तळागाळात रुजवून वंचित गरीब घटकांना सोबत घेऊन राजकारणाबरोबर समाजकारण करण्याचा प्रयत्न करु असे म्हणाले पटवेगार यांच्या निवडीने कुरुंदवाड शिरोळ तालुक्यामधुन अभिनंदन केले जात आहे.

# स्व. विठाबाई नारायणगावकर तमाशापंढरीमध्ये सुमारे पाच कोटी रुपयांची उलाढाल




**नारायणगाव (सा.वा.) :** चैत्र पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर नारायणगाव (ता. जुन्नर) येथील तमाशासम्राज्ञी स्वर्गीय विठाबाई नारायणगावकर तमाशा कलापंढरीमध्ये आज गावागावातील यात्रा कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी, पुढार्यांनी आपल्या गावच्या यात्रेत, जत्रेत तमाशा ठरवण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

राज्यातील बीड, नगर, संभाजीनगर, सांगली, सातारा, ठाणे, नाशिक आदी जिल्ह्यातून आपल्या गावात तमाशा ठरवण्यासाठी अनेक जण तमाशा राऊट्यांमध्ये म्हणजेच तमाशा ठरवण्यासाठी उभारण्यात आलेल्या कार्यालयामध्ये आज मोठ्या संख्येने आले होते.

दरम्यान नारायणगाव मध्ये गेली पन्नास वर्षांपेक्षा जास्त वर्षांपासून येथे राज्यातील तमाशा फड मालक आपल्या तमाशाच्या राहुट्या म्हणजेच कार्यालये सुमारे अडीच ते तीन महिने तमाशा पंढरी मध्ये उभारतात. गाव गावातील यात्रा कमिटीचे सदस्य व पंचकमिटी येथे यात्रेनिमित्त उरुसानिमित्त तमाशा ठरवण्यासाठी येतात. आज पर्यंत झालेल्या एकूण तमाशा करारांची तमाशापंढरीमध्ये सुमारे पाच कोटी रुपयांची उलाढाल झाली. या वर्षी यात्रा हंगामात सर्वात उच्चांकी सुपारी आघाडीचे तमाशा फड मालक रघुवीर खेडकर, मंगला बनसोडे, तुकाराम खेडकर सह पांडुरंग मुळे मांजरवाडीकर या तमाशांना चार लाख रुपयांपर्यंत ठरली. विठाबाई नारायणगावकर यांच्या तमाशाची सुपारी तीन लाख पंधरा हजार रुपयांना ठरली, चंद्रकांत ढवळपुरीकर यांच्या तमाशाची सुपारी तीन लाख २६ हजार रुपये तर मालती इनामदार नारायणगावकर यांच्या तमाशा ची सुपारी ३ लाख १ हजार रूपयांना ठरली. या तमाशा पंढरी मध्ये पाडव्याच्या आजच्या मुहूर्तावर सुमारे दोन कोटी रुपयांची उलाढाल झाली असल्याचे तमाशा फड मालक मोहित नारायणगावकर व संतोष ढवळपुरीकर यांनी सांगितले.

# शिरटीचे ग्रामदैवत श्री भैरेश्वर मंदिराचा दि.२४ पासून कलशारोहण व वास्तुशांती सोहळा

**शिरोळ :** शिरटी (ता शिरोळ) येथील जागृत ग्रामदैवत श्री भैरेश्वर मंदिराचे बांधकाम पूर्णत्वास आले आहे मंदिराचा कलशारोहण व वास्तुशांती सोहळा बुधवार दिनांक २४ ते शुक्रवार दिनांक २६ एप्रिल २०२४ अखेर होणार आहे यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे मंदिराच्या कलशारोहणासाठी गावातील नागरिकांसाठी सवाल व बोली काढण्याचा समारंभ गुरुवार दिनांक ११ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी चार वाजता श्री भैरेश्वर मंदिराच्या प्रांगणात होणार आहे अशी माहिती भैरेश्वर यात्रा समितीचे अध्यक्ष निखिल पाटील व मंदिर कलशारोहन समितीचे अध्यक्ष प्रा प्रशांत पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली

यावेळी बोलताना पाटील म्हणाले शिरटी पंचक्रोशीचे श्रद्धास्थान श्री भैरेश्वर मंदिराचे काम पूर्ण झाले आहे यामुळे मंदिराचा कलशारोहण व वास्तुशांती सोहळा आयोजित करण्यात आला आहे बुधवार दिनांक २४ एप्रिल रोजी कलश स्वागत मिरवणूक व नगरप्रदक्षिणा आयोजित करण्यात आली आहे गुरुवार दिनांक २५ एप्रिल रोजी मंदिरात धार्मिक विधी आयोजित करण्यात आला आहे तर शुक्रवार दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी होमहवन कलश स्थापना होणार आहे मंदिरात ७ मुख्य कलश इतर ४२ कलश असे एकूण ४९ कलशाची स्थापना करण्यात येणार आहे.

आडीबेनाडी येथील श्री दत्त देवस्थानचे मठाधिपती परमपूज्य परमात्माराज महाराज यांच्या अधिपत्याखाली हा धार्मिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे श्री भैरेश्वर मंदिराच्या कलशारोहणासाठी शिरटी गावातील नागरिकांसाठी सवाल व बोली बोलण्याचा कार्यक्रम गुरुवार दिनांक ११ एप्रिल २०२४ रोजी मंदिराच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे.

यामध्ये हत्ती घोडे रथ पारंपारिक वाद्य यासह मुख्य कलशाची बोली बोलणाऱ्यांची मिरवणूक काढण्यात येणार आहे या सलाव व बोलीसाठी शिरटी मधील नागरिकांनी गुरुवारी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सयोजकांनी केले आहे.

तसेच श्री भैरेश्वर देवाची यात्रा व कलशारोहण सोहळा आदर्श आचारसंहितेचे पालन शासनाच्या अटी व शर्ती राहुन शांततेत होणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले

यावेळी राहुल सूर्यवंशी , रामदास भंडारे , आलमनिसार मुल्लाणी , प्रमोद उदगावे , निखिल पाटील , संग्राम शिंदे , राजेश शिरगावे , धनाजी भोसले , अण्णासो सुतार ,अरुण आंबोले , सतीश चौगुले ,जावेद खतीब ,प्रशांत पाटील , अमोल उदगावे यांच्यासह यात्रा समिती व कलशारोहण समितीचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सांगलीतील धग कायम

## विश्वजित कदम, पाटलांची माघार नाही, उलट 'मविआ'ला दिला 'हा' सल्ला

सांगली लोकसभेची जागा काँग्रेसला मिळत नसल्याने मोठ्या प्रमाणात नाराजी आहे. त्यामुळे ही जागा काँगेसला मिळावी अशी मागणी नेहमीच पक्ष श्रेष्टींकडे केली होती. त्यानुसार बुधवारी सांगली जिल्हा कोअर कमेटी नेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीत सांगली लोकसभेच्या जागेबाबत महाविकास आघाडीने पुनर्विचार करावा, अशी मागणी करण्यात आली असल्याची माहिती माजी मंत्री विश्वजित कदम यांनी पत्रकार परिषद घेऊन दिली.

महाविकास आघाडीच्या जागावाटपाची अंतिम बैठक मंगळवारी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मुंबईत झाली. या बैठकीत सांगली व भिवंडी या वादग्रस्त जागेवर चर्चा करण्यात आली. मात्र, सांगलीची जागा शिवसेना व भिवंडीची जागा राष्ट्रवादीने (छर्ला) सोडण्यास नकार दिल्याने सांगलीतून चंद्रहार पाटील यांची महाविकास आघाडीकडून उमेदवारी जाहीर झाली. या निर्णयामुळे सांगली जिल्ह्यातील काँग्रेसला मोठा धक्का



बसला आहे. दिल्लीपर्यंत प्रयत्न करूनदेखील आमदार विश्वजित कदम व इच्छुक उमेदवार विशाल पाटील यांना अपयश आले. त्यामुळे हे दोघेजण मंगळवारपासून नाराज होते.

या नाराजी नाट्यानंतर बुधवारी सांगली जिल्ह्यातील काँग्रेस नेत्यांची बैठक पार पडली. त्यामध्ये पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी पुन्हा एकदा ही जागा काँग्रेसला सोडण्यात यावी, यासाठी महाविकास आघाडीतील घटक पक्षांकडे मागणी करण्यात येणार असल्याचे विश्वजित कदम यांनी स्पष्ट केले.

महाविकास आघाडीकडून जागावाटप जाहीर झाले असले तरी अद्याप काही जागांवर उमेदवार निश्चित झालेले नाहीत. त्यामुळे भविष्यात जागा अदलाबदल होऊ शकते. भाजपच्या पराभवाची तयारी आम्ही केली आहे. त्यामुळे ही जागा काँग्रेसलाच मिळणे आवश्यक असल्याचे कदम यावेळी बोलताना म्हणाले.

या बैठकीस आमदार विश्वजित कदम, विशाल पाटील, आमदार विक्रम सावंत, जयश्री पाटील यांच्यासह कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# विद्यापीठ प्रशासनाची प्रसार माध्यमांवर सेन्सॉरशिप?

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत प्रसार माध्यमांवर सेन्सॉरशिप लावण्याचा ठराव घेण्यात आला आहे. या ठरावानुसार विद्यापीठ प्रशासनाकडून बातम्यांची तपासणी केल्यानंतरच त्या प्रसार माध्यमांनी छापाव्यात. त्यासाठीचे पत्र प्रशासनाकडून प्रसार माध्यमांना देण्यात येणार असल्याची माहिती नाव न छापण्याच्या अटीवर व्यवस्थापन परिषद सदस्यांनी दिली.विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक बुधवारी प्रशासकीय इमारतीमध्ये घेण्यात आली. या बैठकीत प्रसार माध्यमांतील बातम्यांमुळे विद्यापीठाची बदनामी होत असल्याचा विषय ऐनवेळी चर्चेला घेण्यात आला. या विषयावर काही व्यवस्थापन परिषद सदस्यांनी आक्रमक भूमिका मांडली. प्रसार माध्यमांमध्ये येणाऱ्या बातम्यांमुळे विद्यापीठाची बदनामी होत आहे.

त्यामुळे प्रसार माध्यमांना प्रतिबंध घालण्यासाठी खल करण्यात आला. एका सदस्याने तर प्रसार माध्यमांना नोटिसा देण्याची सूचना केली, तर एकाने प्रसार माध्यमांना अधिसभेच्या बैठकीत सहभागी होण्याची परवानगी दिल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. प्रसार माध्यमांमध्ये केवळ विद्यापीठाची वाहवा करणाऱ्याच बातम्या आल्या पाहिजेत, असाच एकूण या चर्चेचा सूर होता. शेवटी विद्यापीठ प्रशासनाने सर्व प्रसार माध्यमांना पत्र पाठवून विद्यापीठाच्या बातम्या छापण्यापूर्वी प्रभारी कुलसचिवांनी तपासणी करून घेतली पाहिजे, असे ठरविण्यात आल्याचे व्यवस्थापन परिषद सदस्यांनी सांगितले.



मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

## / गुन्हे वृत्त... /

### मारहाण प्रकरणी परस्परविरोधी गुन्हे

**सातारा :** शिवीगाळ झाल्याच्या कारणातून चिडून जावून मारहाण केल्याप्रकरणी परस्पर विरोधी गुन्हे दाखल झाले आहेत. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, रुपाली सुनील कांबळे यांनी गोदावरी क्षिरसागर, दिपक भिसे, आनंद क्षिरसागर, मोरेश्वर कांबळे यांच्या विरुध्द तक्रार दिली आहे. दुसरी तक्रार मोरेश्वर चंद्रकांत कांबळे यांनी रुपाली कांबळे, संगीता भराळ (सर्व दुर्गा पेठ, सातारा) यांच्या विरुध्द तक्रार दिली आहे. ही घटना दि. ७ व ८ एप्रिल रोजी घडली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. काठीने व दगडाने मारहाण केली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान, दोन्ही तक्रारदार पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेल्यानंतर पुन्हा तेथेही एकमेकांना शिवीगाळ केली. या घटनेमुळे शहर पोलीस ठाण्यासमोर तणावाचे वातावरण निर्माण झाले. यामुळे पोलिसांनी सुनील कांबळे, रुपाली कांबळे, संगीता भवाळ, मोरेश्वर कांबळे, आनंद क्षिरसागर, लक्ष्मी क्षिरसागर (सर्व रा.दुर्गा पेठ) यांच्या विरुध्द सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणाची तक्रार दाखल केली.

### आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी आरटीओ एजंटसह दोघांवर गुन्हा

**सातारा :** एकाची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी आरटीओ एजंटसह दोघांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, ट्रक स्वत:च्या नावावर करुन घेत त्याचे भाडे न देता ६ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आनंद एकनाथ चोपदार (रा. मालाड, मुंबई) व आरटीओ एजंट संतोष शिंदे (रा.सातारा) यांच्या विरुध्द बजरंग महादेव शिंगाडे (वय ३८, रा. ठाणे, मुंबई) यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. जानेवारी २०२३ ते एप्रिल २०२४ या कालावधीत ही घटना घडली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

## पान १ वरून

पान १ वरून

### राष्ट्रवादीचे साताऱ्यात १५ रोजी शक्तीप्रदर्शन

आरोपही पाटील यांनी केला. सुरेश जाधव म्हणाले, राष्ट्रीय काँग्रेस हा इंडिया आघाडीचा मूळ घटक पक्ष आहे. सातारा प्रथमपासून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचा आहे. त्यांनी जो उमेदवार दिला आहे, त्यास सहमती आहे. या निवडणुका देशात लोकशाही राहणार की नाही हे ठरणाऱ्या आहेत. देशात धर्मांध शक्तींवर अंकुश, अदानी अंबानींवर नियंत्रण राहणार की नाही, हे ठरवणारी निवडणूक आहे. समोर कोण उमेदवार आहे यापेक्षा दोन्ही दोन राज्यपद्धती याचा विचार केला जाणार आहे. लोकशाहीचे रक्षण, स्त्रियांवरील अत्याचार, शेतकऱ्यांचे प्रश्न हे महत्त्वाचे मुद्दे आहेत. साताऱ्याची लढाई शरद पवार विरुद्ध मोदी, अशी नाही तर जातीयवादी धर्मांध शक्ती, कॉर्पोरेट भांडवलशाही याविरोधात कामगार, स्त्रिया, दलित, अल्पसंख्याक, ओबीसी यांची लढाई आहे, असेही आ. बाळासाहेब पाटील यांनी सांगितले.

### मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारात 'होम मिनिस्टर'ही सक्रिय!

मिळत आहे. मी जवळपास सहाही विधानसभा मतदारसंघात जाऊन आले आहे. यापुढेही पक्षाच्या वतीने जसे नियोजन केले असेल तसे प्रचारात आपण सहभागी होणार असल्याचेही मोनिका यांनी स्पष्ट केले. पुणे शहरात लोकसभेसाठी १३ मे यादिवशी मतदान होणार असून अद्याप निवडणुकीची अधीसूचना जाहीर झालेली नाही. त्यात उन्हाचा कडाका वाढत असताना मोहोळ यांच्या भेटीगाठी वाढल्या असून महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून प्रचाराच्या नियोजनाची लगबग सुरू आहे. गेले काही दिवस रोज शहरातील मान्यवरांपासून सर्वसामान्यांपर्यंत अनेकांच्या भेटीगाठी घेण्याचे काम मुरलीधर मोहोळ व त्यांच्या होम मिनिस्टर या स्वतंत्रपणे करत आहेत. मधेच संस्था किंवा समाजांच्या मेळाव्याला उपस्थित रहात असून समाजबांधवांशी संवाद साधत आहेत.

### धैर्यशील मोहिते पाटील १३ एप्रिलला शरद पवार गटात करणार प्रवेश

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटांकडून कार्यकर्त्यांनासुद्धा सोलापूरमध्ये येण्याचं आवाहन करण्यात आलेलं आहे. धैर्यशील मोहिते पाटील हे शरद पवार गटात प्रवेश करत असताना मोहिते पाटलातील कोणते नेते आणि पदाधिकारी या मंचावर उपस्थित राहणार हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

### छत्रपती संभाजीनगरातील तीन तरुणांची एनआयएकडून चौकशी

घडवण्यात आला होता. या प्रकरणी संशयित असलेल्या दहशतवादी अब्दुल मतीन आणि मुसव्वूर हुसेन शाजीब यांच्याशी संभाजीनगर इथल्या मयूर पार्कचे तीन युवक संपर्कात असल्याची माहिती समोर आली होती. १ मार्चला बंगळुरूमधील प्रसिद्ध रामेश्वरम कॅफेमध्ये स्फोट होऊन ११ जण गंभीर जखमी झाले होते. आयईडी टायमर वापरुन हा बॉम्बस्फोट करण्यात आला होता. क्रिप्टोकरन्सीच्या माध्यमातून ते संशयितांच्या संपर्कात असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. त्यानुसार त्यांचे व्यवहार तपासणी करण्यासाठी एनआयए पथक शहरात दाखल झाले होते, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

बॉम्बस्फोटात संशयित असलेल्या अब्दुल मतीन आणि मुसाविर हुसैन शाजिब यांच्या सोबत क्रिप्टोकरन्सीच्या माध्यमातून संपर्क आल्याची माहिती तपास यंत्रणांना मिळाली. त्यानुसार मंगळवारी केंद्रीय तपास यंत्रणेचे पथक शहरात दाखल झाले. मयूर पार्क येथे राहत असलेल्या तिघांची त्यांनी जवळपास आठ तास कसून चौकशी केली. शहरात राहणारे तिघंही एकमेकांचे मित्र असून स्फोटातील आरोपी यांना ते ओळखत नसल्याचं त्यांनी सांगितलं. त्यांच्याकडं असलेले मोबाईल, लॅपटॉप आणि इतर कागद पात्रांची त्यांनी तपासणी केली. त्यावेळी त्यांना पुन्हा चौकशीसाठी कार्यालयात हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले. जवळपास ८ तास चौकशीनंतर नोटीस बजावून पथक रवाना झालं. याआधी याच भागातून एका युवकाला ताब्यात घेण्यात आलं होतं. त्यामुळे पुन्हा एकदा याच भागातील तिघांची चौकशी झाल्यानं शहरात दहशतवादाची पाळंमुळे रुजली आहेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### नजरकैदेत ठेवण्याची मागणी गौतम नवलखांना पडली भारी; एनआयएनं दिलं १.६४ कोटींचे बिल

त्यासाठी एनआयएने नवलखा यांना १.६४ कोटींचे बिल पाठवले आहे. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले असून न्यायालयानेही हे बिल अदा करावे, असे आदेश दिले आहेत. ''तुम्हीच नजरकैदेत ठेवण्याची मागणी केली होती, त्यामुळे हे पैसे भरावे लागतील'', असे न्यायालयाने सांगितले. सर्वोच्च न्यायालयाच्या न्या. एम. एम. संद्रेश आणि न्या. एसव्हीएन भट्टी यांच्या खंडपीठासमोर एनआयएने नवलखा यांच्या सुरक्षेवर झालेल्या खर्चाची माहिती दिली. ''जर तुम्ही नजरकैदीच मागणी केली होती, तर तुम्हाला पैसे भरावे लागतील'', असे स्पष्ट निर्देश खंडपीठाने नवलखा यांची बाजू मांडणाऱ्या वकिलांना दिले. अतिरिक्त महाधिवक्ता एस. व्ही. राजू यांनी एनआयएची बाजू न्यायालयात मांडली. ७० वर्षीय गौतम नवलखा यांना सुरक्षा पुरविण्यासाठी त्यांच्या निवासस्थानाबाहेर पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. त्यावर एकूण १.६४ कोटी रुपये खर्च झाल्याचा दावा एनआयएने केला आहे.

# 'सातारा' हा महाराष्ट्राची ओळख आहे - उदयनराजे भोसले

## कराडला महायुतीचा कार्यकर्ता संवाद मेळावा संपन्न

**राजदंड / कराड**

सातारा हा महाराष्ट्राची ओळख आहे. या जिल्ह्याने महाराष्ट्राबरोबरच देशाला दिशा देण्याचे काम केले. अशा या जिल्ह्यातील अनेक नेत्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण आजवर लोकहितासाठी राजकारण नव्हे तर समाजकारणच केले आहे. यापुढेही ते करत राहू, अशी ग्वाही खासदार उदयनराजे भोसले यांनी दिली. दरम्यान, सातारा हा जाणता राजाला मानणारा जिल्हा आहे. असं असलं तरी गाफील राहून चालणार नाही, प्रत्येक विधानसभा मतदारसंघात ट्रिपल लेयर मायक्रो प्लॅनिंग करावे लागेल, अशी सूचना पालकमंत्री ना. शंभुराज देसाई यांनी अध्यक्षस्थानावरून बोलताना केली.

कराडजवळच्या विजयनगर येथे कराड दक्षिण, कराड उत्तर व पाटण विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा सोमवारी आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ना. नरेंद्र पाटील, आमदार शिवेंद्रराजे भोसले, माजी आमदार आनंदराव पाटील, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. अतुल भोसले, जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, मनोज घोरपडे, सातारा लोकसभा समन्वयक रामकृष्ण वेताळ, भरत पाटील, विक्रमबाबा पाटणकर, सुनील काटकर, चित्रलेखा माने-कदम, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, जयवंत शेलार, भीमराव पाटील, माजी नगराध्यक्षा रोहिणी शिंदे, कविता कचरे, अक्षय मोहिते, सुलोचना पवार, पंजाबराव देसाई, विजय पवार, पै. धनाजी पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

उदयनराजे म्हणाले, एकेकाळी दोन माणसांचा पक्ष असं म्हटलं जाणारा भाजपा हा देशातील सर्वात मोठा पक्ष बनला आहे. या पक्षाच्या माध्यमातून आपण अनेक कामे जिल्ह्यात यापूर्वी केली आहे. समाजहित हे ध्येय असेल तर लोकांना एकत्र आणण्यासाठी दबावाची गरज नसते. २०१९ ला आपण तडकाफडकी निर्णय घेतला. त्याचा परिणाम व्हायचा तो झाला. पण मनात पाप नसेल तर देव साथ देतो आणि लोकंही साथ सोडत नाहीत याचा प्रत्यय आज येतो आहे. मतदान जवळ येईल तशा अफवा उठवल्या जातील, मात्र लोकांनी अफवांना बळी पडू नये , असे सांगत यावेळी महायुतीच्या उमेदवाराच्या मताधिक्याचा नवा विक्रम नोंदवूया, असे आवाहनही उदयनराजेंनी केले.



शंभूराज म्हणाले, आम्ही ४० आमदारांनी मोठं धाडस केलं. पण त्यावेळी पुढे काय होईल हे माहीत नव्हतं. आमचे ४० ते ५० आमदार असताना आणि भाजपचे १६० आमदार असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी आमच्या नेत्यालाच थेट मुख्यमंत्रीपदाची संधी देत या धाडसाचे कौतुक केले. आम्हीही ज्या नेत्यावर विश्वास ठेवला त्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमच्या राजकीय भवितव्याला कुठेही ठेच पोचू नये याची तंतोतंत काळजी घेतली. महाराष्ट्र शासनाने शेकडो योजना राबवल्या आहेत, पालकमंत्री म्हणून जिल्ह्यात या योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचा माझा प्रयत्न राहिला आहे.

'सातारा' हा जाणत्या राजाला मानणारा जिल्हा आहे, हे जरी खरं असलं तरी गाफील राहून चालणार नाही. निवडणूक जिंकण्यासाठी आम्ही शिवसेनेच्या माध्यमातून करतो तसे ट्रिपल लेयर मायक्रो प्लॅनिंग प्रत्येक विधानसभा मतदारसंघात आपणाला करावे लागेल. दिलेली जबाबदारी प्रत्येक घटक व्यवस्थितपणे पार पाडतोय का नाही हे तपासण्याची वेगवेगळी यंत्रणा असली पाहिजे, अशी सूचना पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी मांडली.

सातारा मतदारसंघातून महायुतीमधून लोकसभेला मी इच्छुकच आहे, उदयनराजेंसारखी आमची दिल्लीत फील्डिंग नाही. आम्ही भाजपाचे प्रदेश कार्यालय, सागर बंगला आणि जिल्हा कार्यालयाच्या संपर्कात आहोत, उमेदवारी अद्याप अधिकृतपणे जाहीर झाली नसल्याने अजूनही मला आशा आहे असे सांगून माथाडी नेते ना. नरेंद्र पाटील म्हणाले, महाराज जेथे उभे, तेथे सगळे आडवे असं होतात. गत वेळी मी त्यांच्या विरोधात होतो, पण आज त्यांच्या बाजूने उभा आहे. अधिकृत उमेदवारी जाहीर होणाऱ्या महायुतीच्या उमेदवाराला या मतदारसंघातून भरघोस मतांनी निवडून देऊया, असे आवाहन त्यांनी केले.

अधिकृत उमेदवारी जाहीर होत नाही तोपर्यंत उघड बोलणे टाळले पाहिजे, असे सांगून उदयनराजेच भाजपाचे अर्थात महायुतीचे उमेदवार असतील आणि त्यावर लवकरच शिक्कामोर्तब होईल असा विश्वास आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी व्यक्त केला.

प्रस्ताविकात संयोजक डॉ. अतुल भोसले म्हणाले, देशाला जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था करण्याचे काम पंतप्रधान मोदी यांच्या सरकारकडून सुरू आहे. विविध योजना राबवून शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात हातभार लावण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. कराड दक्षिण मतदारसंघात विकासकामांचा झंझावात सुरू आहे. पक्ष संघटनेची मजबूत बांधणी आहे. त्यामुळे आपण पालकमंत्र्यांना शब्द देत आहोत की महायुतीच्या उमेदवाराला कराड दक्षिण मतदारसंघातून मोठी आघाडी देऊ.

राजेंद्रसिंह यादव यांनी आभार मानले.

### मारहाण प्रकरणी १२ जणांवर गुन्हा

**सातारा :** एकास मारहाण केल्याप्रकरणी १२ जणांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, भांडणाच्या कारणातून अनोळखी १२ जणांनी दगडाने मारहाण केल्याप्रकरणी सौ.निर्मला भारत काळे (रा.गोडोली, सातारा) यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

ही घटना दि. ७ एप्रिल रोजी गोडोली येथे घडली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

## तळजाई टेकडीवर रवींद्र धंगेकर, सुनेत्रा पवार यांनी साधला संवाद

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** दक्षिण पुण्याच्या सौंदर्याचा मुकुट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तळजाई टेकडी परिसरात महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर आणि महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी मॉर्निंग वॉकसाठी गेल्यानंतर परिसरातील नागरिकांशी संवाद साधला.

शुध्द हवा,चालण्यासाठी मातीची नैसर्गिक पायवाट, चारही बाजूला घनदाट झाडे, पक्षांची किलबिलाट या सर्व वातावरणात तळजाई टेकडी वर्षाचे बारा महिने दक्षिण पुण्यातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत असते.



तळजाई टेकडीच्या संवर्धनासाठी तिच्या अधिकाधिक वृक्षारोपण, अधिकाधिक पानवठे तयार करणे, नागरिकांना चांगल्या पिण्याच्या पाण्याची सोय, चांगल्या दर्जाची स्वच्छतागृहे, दिशादर्शक फलक, लाईटची सोय, नियमित साफसफाई करणारी स्वयंभू यंत्रणा या सर्व गोष्टी होणे गरजेचे आहे. निश्चितच तळजाई टेकडी संवर्धनासाठी यापुढील काळात सर्वसमावेशक काम करण्याचा माझा मानस राहील, असे रवींद्र धंगेकर यांनी सांगितले.

'मॉर्निंग वॉक' दरम्यान जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रावहिनींची देखील या ठिकाणी भेट झाली. यावेळी सर्व पक्षीय पदाधिकारी उपस्थित होते, असेही धंगेकर म्हणाले.

### 'घोर नैराश्याची १० वर्षे' पुस्तिकेचे आज मधुकर भावे यांच्या हस्ते प्रकाशन

**पुणे :** गेल्या १० वर्षातील केंद्रातील भाजप सरकारच्या अपयशांवर मार्मिक टिपणी करणाऱ्या '' घोर नैराश्याची १० वर्षे '' या पुस्तकाचे प्रकाशन गुरुवार दि. ११ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता टिळक स्मारक मंदिर येथे जेष्ठ विचारवंत व संपादक मधुकर भावे यांच्या हस्ते होईल. या प्रसंगी कार्यकर्ता मेळावा देखील आयोजित करण्यात आला आहे. याचे अध्यक्षस्थान जेष्ठ गांधीवादी विचारवंत उल्हास पवार भूषवणार असून विश्वंबर चौधरी व ॲड. असीम सरोदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

## मनसेच्या पाठिंब्यामुळे मोठ्या मताधिक्याने जिंकू : मुरलीधर मोहोळ

**राजदंड न्यूज नेटवर्क**



**पुणे :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राजसाहेब ठाकरे यांनी महायुतीला शिवतीर्थावरुन दिलेला बिनशर्त पाठिंबा, हा त्यांच्या देशाच्या विकासाबद्दल असलेला सच्चेपणा अधोरेखित करतो. हिंदू नववर्षाच्या शुभदिनी केलेल्या या घोषणेमुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांना निश्तितच बळ मिळाले आहे. पुणे लोकसभा निडणुकीतही मनसैनिकांना सोबत घेऊन आम्ही एकदिलाने या निवडणुकीला सामोरे जाऊ आणि मोठ्या मताधिक्याने जिंकू, हा विश्वास वाटतो, अशी प्रतिक्रिया पुणे लोकसभा माहायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

दरम्यान, पुण्यात मोहोळ यांना मनसेने पाठिंबा दिल्याने त्यांच्या मताधिक्यात वाढ होणार असल्याचे बोलले जात आहे. राज ठाकरे यांनी बिनशर्त पाठिंबा दिला आहे. त्यामुळे महायुतीच्या उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. पुणे, मुंबई, नाशिक जिल्ह्यात मनसेची मोठी ताकद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा सत्तेत आणण्यासाठी हा पाठिंबा दिल्याची चर्चा आहे. यापूर्वी २०१९ मध्ये 'लाव रे तो व्हिडीओ', म्हणून राज ठाकरे यांनी मोदींवर टीका केली होती. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज यांची भेट घेऊन पाठिंबा देण्याची विनंती केली होती. त्या पार्श्वभूमीवर राज यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. आणि माहायुतीला बिनशर्त पाठिंबा देत असल्याचे जाहीर केले.

## परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर साधणार युवकांशी संवाद

### 'जर्नि ऑफ ग्लोबल राइझ ऑफ इंडिया' या विषयावर शुक्रवारी व्याख्यान

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** आश्वासक युवा पिढीला संधीचे नवे जागतिक द्वार उघडुन देणारा विकसित भारताचा संकल्प मांडण्यासाठी भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर 'जर्नि ऑफ ग्लोबल राइझ ऑफ इंडिया' या विषयावर पुण्यातील युवकांशी संवाद साधणार आहेत. बालगंधर्व रंगमंदिर येथे शुक्रवारी (ता. १२ एप्रिल) सायंकाळी ५.०० वाजता या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. समर्थ युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेश पांडे आणि युवा सुराज्य प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष पुनीत जोशी यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

देशाचे रॉकस्टार फॉरेन मिनिस्टर अशी ओळख असलेले एस जयशंकर यांनी अवघ्या पाच वर्षांत भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा साफ बदलवली. कोणत्याही कुरापती खपवून न घेणारे आणि त्याचवेळी जगाच्या कल्याणाचा विचार करणारे जबाबदार राष्ट्र अशी भारताची प्रतिमा निर्माण करण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. यापूर्वीच त्यांचा आंतरराष्ट्रीय



प्रशासकीय अनुभव, त्यांची कार्यशैली यामुळे ते युवकांमध्ये विशेष लोकप्रिय आहेत.

पत्रकार परिषदेत कार्यक्रमाची माहिती सांगताना पांडे म्हणाले ''विकासाची भूक असणारे, झपाट्याने प्रगती करणारे, स्वतःच्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्वस्व पणाला लावणारे राष्ट्र म्हणून भारत जगाच्या पटलावर पुढे आला. यासाठी मोलाची भूमिका बजावणारे, युवकांमध्ये लोकप्रिय रॉकस्टार फॉरेन मिनिस्टर पुण्यात येणार आहेत, हे पुणेकरांसाठी अत्यंत महत्वाचे आहे. भारताचे परराष्ट्र धोरण पुण्यावर थेट परिणाम करते. कारण, पुणे उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात थेट आंतरराष्ट्रीय संस्थांशी जोडलेले आहे. माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, वाहन, शेतीमाल प्रक्रिया, औषधनिर्माण ही उद्योगांची पाच क्षेत्रे पुण्यातून जगाशी व्यवहार करतात. भारतातून दरवर्षी सुमारे दहा लाख विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशी जातात. त्यापैकी महाराष्ट्राचा वाटा १२.५ टक्के आहे. त्यामध्ये पुण्याचा वाटा सर्वाधिक आहे. भारताच्या आंतरराष्ट्रीय संबंधांबद्दल पुणे अत्यंत जागरूक महानगर आहे. म्हणून भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांनी पुणेकरांशी संवाद साधणे महत्वाचे आहे.''

जोशी म्हणाले, ''राजनैतिक भाषेचा सफाईदारपणा, निस्सीम देशभक्ती आणि देशासमोरील प्रश्नांची नेमकी जाण एस. जयशंकर यांना आहे. जग भारताकडे कसे पाहाते याबद्दल आजच्या तरुण पिढीला सतत उत्सुकता असते. जगात भारताची मान उंचावत आहे याचा तरुण वर्गाला अभिमान आहे. जयशंकर यांचे एकएक विधान तरुण वर्ग उत्साहाने पाहातो, ऐकतो आणि अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवतो. असे कर्तृत्ववान परराष्ट्रमंत्री पुण्यातील तरूणाईशी खास संवाद साधणार आहेत. पुणेकरांनी या व्याख्यानाला मोठा प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करतो.''

## हांडेवाडी परिसराला जाणवतेय भीषण पाणीटंचाई

### हांडेवाडी गावास मनपाच्या फक्त सहा टॅन्करद्वारे पाणीपुरवठा

**हडपसर : प्रतिनिधी**

सध्या कडक उन्हाळा सुरु झाला असून उन्हाचा पारा वाढलेला असताना हडपसर क्षेत्रीय कार्यालय हद्दीलगत असलेल्या नव्याने पुणे महापालिकेत समाविष्ट करण्यात हांडेवाडी गावाला व परिसराला सध्या भिषण पाणीटंचाई जाणवत असून नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी खाजगी एका पाणी टॅन्करला जवळपास १२०० ते १५०० हजार रुपये मोजावे लागत असल्याचे नागरीक सांगत आहेत.

सार्वजनिक ग्रामपंचायत असलेल्या पाणी टाकीत मनपाचे रोज फक्त सहा पाणी टॅन्कर टाकीत टाकले जाते आणि त्यातून नळाला पाणीपुरवठा केला जातो, ग्रामपंचायतीच्या कुपनलिकेस पाणी नसल्याने टॅन्करनेच पाणी पुरवठा केला जातो,

कडक उन्हाळा असल्याने शेतकऱ्यांच्या विहिरी आटल्या आहेत. नळाला, बोअरला पाणी येत नसल्याने हांडेवाडी, होळकरवाडी, उंड्री परिसरातील नागरीकांना पाणी टंचाई भासत असल्याने खाजगी टॅन्करला पैसे मोजावे लागत असल्याने पाण्यासाठी नागरिकांचे महिन्याचे अर्थिक बजेट कोलमडून जात आहे.

आनंदनगर, न्हावलेनगर, मयुरपार्क, सिध्दीविनायक भागात टॅन्करने पाणीपुरवठा केला जात आहे. हांडेवाडी, उंड्री, होळकरवाडी, हांडेवाडीरोड आदी भागातील सोसायटी खाजगी टँकर मागवून आपली तहान भागवत आहेत.

हांडेवाडी गाव पुणे महापालिकेत समाविष्ट झालेले असलेतरी येथील भागातील नागरीकांच्या मुलभूत नागरी सुविधा अद्याप पर्यंत सुटलेल्या नाहीत, पुणे महापालिकेने हांडेवाडी परिसराला पाणी टंचाई दुर करण्यासाठी टॅन्करची संख्या वाढवावी, कायमस्वरुपी पाणी लाईन टाकण्यात यावी, पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा अशी मागणी नागरीकांनी केली .

> **"हांडेवाडी व परिसराला पाणी टंचाई भासत असून मनपाचे सहा टँकर ग्रामपंचायत टाकीत टाकले जाते, मग त्यातून पाणीपुरवठा होतो. तो सध्या उन्हाळा असल्याने पाणी पुरत नाही, आमच्या अनेक भागात टँकरने पाणीपुरवठा होतो, सोसायटी खाजगी पाणी टँकर विकत घेतात, १५०० पर्यंत टॅन्कर विकला जातो, तो परवडत नाही, मनपाकडून कायमस्वरूपी नियोजन झाले पाहिजे.**
>
> **- अशोक न्हावले,**
> **माजी उपसरपंच, हांडेवाडी**

> **"आमच्या भागात सध्या भिषण पाणी टंचाई निर्माण झालेली आहे, विहिरींना पाणी नाही, बोअर आटल्या आहेत , सध्या या भागास पुणे महापालिकेकडून टॅन्कने पाणीपुरवठा होत आहे, सोसायटीचे नागरिक खाजगी टॅन्करला पैसे देऊन पाणी विकत घेतात ते परवडत नाही, कायमस्वरुपी पाण्याचे नियोजन झाले पाहिजे.**
>
> **- निवृत्तीआण्णा बांदल**
> **माजी सरपंच, उंड्री**




> **"आमच्या आनंदनगर भागात टॅन्करने पाणी येते , ते पण पुरत नाही पिण्याच्या व वापरण्यासाठी पाणी टंचाई होते, विहिरीत पाणी नाही, बोअरचे पण एकदम कमी येते त्यामुळे पाण्यावाचून आमचे हाल होते मनपा प्रशासनाने आमच्या भागात नळपाणी लाईन टाकावी कायमचा पाणीप्रश्न सोडवावा.**
>
> **- दिपक बापू हांडे (स्थानिक नागरिक )**

# पुढील ३ दिवसांत बहुतांश ठिकाणी अवकाळी पावसाचा मारा

## हवामान खात्याचा अंदाज

**मुंबई :** राज्याला बसणा-या उन्हाच्या झळा कायम असून, बुधवारी मालेगावचे कमाल तापमान ४२ अंश नोंदविण्यात आले आहे. उर्वरित शहरेही ३८ अंशावर जाऊन ठेपली असतानाच पुढील ३ दिवसांसाठी राज्यातील बहुतांशी ठिकाणी अवकाळी पावसाचा मारा होईल, असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. दुसरीकडे मुंबईचे कमाल तापमान ३३ अंशावर स्थिर असले तरी वाढती आर्द्रता मुंबईकरांचा घाम काढत असल्याचे चित्र आहे.

खान्देश, मराठवाडा व विदर्भातील जिल्ह्यात ३ दिवस म्हणजे गुरुवार ते शनिवारपर्यंत मध्यम अवकाळी (वीजा, वारा, गारा ) पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील जिल्ह्यात ढगाळ वातावरण राहून अगदीच तुरळक ठिकाणी किरकोळ पावसाची शक्यता आहे. मुंबईसह कोकणात वातावरण कोरडे राहणार असुन दिवसाचे कमाल तापमान सरासरीपेक्षा एक ते दिड डिग्रीने अधिक असेल, अशी माहिती हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

# ‘ईद’च्या शिरखुर्म्याचा गोडवा महागला

## नाशिकमध्ये दुध ‘तापले’ सुकामेवाही वधारला

**नाशिक :** शहर व परिसरात दुधाला मागील दोन दिवसांपासून मागणी अधिक वाढली आहे. तसेच, रमजान पर्व हे महिनाभरापासून सुरू होते. यामुळेही नागरिकांकडून एरवीपेक्षा जास्त दुधाची खरेदी केली जात होती. यामुळे रमजानकाळात दुधाचे दर किरकोळ बाजारात प्रति लिटर १० रुपयांनी वाढले.रमजान ईदगुरुवारी (दि.११) साजरी केली

जाणार असल्याने पूर्वसंध्येला बुधवारी (दि.१०) बाजारात दूध अधिक ‘तापले.’शहरातील जुनेनाशिकमधीलशहीद अब्दुल हमीद चौकात भरणारा दूध बाजार, तसेच वडाळारोड, वडाळागाव, पखालरोड या भागात दूध विक्रीची खासगी दुकाने आहेत. वडाळा गावात असलेल्या गोठ्यांमधूनसुद्धा दुधाची किरकोळी विक्री काउंटरवरून केली जाते. रमजान अगोदर दुधाची ७० ते ७५ रुपये प्रति लिटर दुधाची विक्री होत होती. उन्हाळा तीव्र होताच दूध व दुग्धजन्य पदार्थांना मागणी वाढली. ताक, लस्सी, श्रीखंड, बासुंदी, आइस्क्रीम पार्लरमध्ये दुधाची मागणी होऊ लागली. तसेच, महिनाभरापूर्वी रमजान पर्वालाही प्रारंभ झाला होता. यामुळे दुधाची मागणी दुप्पट झाली. परिणामी रमजानकाळात शहरासह उपनगरांत दूध प्रतिलिटर ८० ते ८५ रुपये दराने विक्री केले गेले.

संपूर्ण महिनाभर हे दर स्थिर राहिले होते; मात्र मंगळवारपासून (दि.९) दुधाचे दर पुन्हा अस्थिर झाले. दूध बाजारासह किरकोळ दुधाची विक्री काउंटरवरूनसुद्धा प्रतिलिटर ९० रुपये प्रमाणे दुधाची विक्री होत होती. बुधवारी दूध बाजारात दुधाचा भाव संध्याकाळी १००रुपये प्रति लिटरपर्यंत जाऊन पोहोचला होता.दूध खरेदीसाठी रांगारमजान ईदच्यापूर्वसंध्येला बुधवारी शहरातील जुने नाशिक, वडाळारोड, वडाळागाव भागात दूध खरेदीसाठी दूध विक्रीच्या दुकानांवर नागरिकांनी गर्दी केली होती. यामुळे दुधाचा पुरवठाही कमी पडला. सर्वांना दूध मिळावे, यासाठी काही दूध विक्रेत्यांनी प्रति व्यक्ती १ लिटर इतकीच दूध विक्रीसुद्धा केल्याचे चित्र वडाळागावात पाहावयास मिळाले. शिरखुर्म्याच्या गोडव्याला महागाईचा तडकातीव्र उन्हाळा, चारादंचाई आणि दुधाला वाढलेली मागणी यामुळे पुरवठा कमी पडू लागला आहे. मागणीच्या तुलनेत दुधाचा पुरवठा अपुरा पडत असल्याने दूध बाजारात दर गडगडले. सणासुदीचा काळात दुधाची मागणी दुप्पट झाली. तसेच, यंदा खोबरे वगळता सर्व प्रकारच्या सुकामेव्याचे दर भडकले आहेत.

चारोळी, किसमिस, खारीक, पिस्ता, काजू, बदाम हा सर्व सुकामेवा महागला आहे. यामुळे यंदा ईदच्या शिरखुर्म्याच्या गोडव्याला महागाईचा तडका मिळत आहे. वाढत्या महागाईमुळे नागरिकांमध्ये नाराजीही व्यक्त केली जात आहे.

# स्वामी समर्थांच्या जयघोषाने अक्कलकोट नगरी दुमदुमली



**सोलापूर :** अनंत कोटी ब्रम्हांडनायक राजाधिराज योगीराज श्री स्वामी समर्थ महाराज की जय च्या जयघोषात बुधवारी श्री स्वामी समर्थ प्रकट दिन भक्तीभावात साजरा करण्यात आला. बुधवारी श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक दाखल झाले आहेत.

दरम्यान, स्वामी नामाच्या जयघोषाने मंदिराचा परिसर दुमदुमून गेला आहे. दुपारी १२ वाजता वटवृक्ष मंदिरात भाविकांच्या उपस्थितीत पाळणा व गुलालाचा कार्यक्रम झाला. दर्शन रांगेतील भाविकांना उन्हाचा त्रास होवू नये यासाठी सावलीची व पाणी, शरबताची सोय केली आहे. समाधी मंदिरातही भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली आहे. अक्कलकोटप्रमाणेच सोलापूर शहरातील स्वामी मंदिरात ठिकठिकाणी भजन, पाळणा, गुलाल, पारायण व महाप्रसादाचे कार्यक्रम होत आहेत.

दरम्यान, वटवृक्ष मंदिरात पहाटे साडेपाच वाजता मंगल आरती झाली. त्यानंतर दर्शनासाठी मंदिरं खुलं झाले. पूजेनंतर मंदिरात आलेल्या दहा हजार भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. दुपारच्यावेळी भाविकांना दिलासा देण्यासाठी शरबत वाटप करण्यात आले. यंदाच्या वर्षी स्वामींना ड्रायफ्रुट लाडू, बेसन लाडू, कोकोनट चिक्की, चॉकलेट कुकीज व हँडमेड चॉकलेट अशा पंचपक्कान प्रसाद म्हणून अर्पण करण्यात आला.

# कोल्हापूरकरांनी दोन दिवसांत ७४ लाखांचा आंबा केला फस्त

**कोल्हापूर :** कोल्हापूरजिल्ह्यात गेल्या दोन दिवसांत कोकण हापूस, लालबाग व मद्रास हापूस आंब्याची विक्री मोठ्या प्रमाणात झाली. तब्बल १७ हजार ८६९ बॉक्स आणि ५०० हून अधिक पेट्यांची विक्री झाली असून कोल्हापूरकरांनी गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर ७४ लाखांचाआंबाफस्त केला आहे. यंदा आवक चांगली असली तरी उठावही अधिक आहे.यंदा हापूस आंब्याची आवक लवकर झाली आहे. साधारणत: गुढी पाडव्याच्या मुहूर्तावरआंबाखरेदी केली जाते. त्यामुळे सोमवारी व मंगळवारी दिवसभर बाजार समितीसह शहरातील फळ मार्केट व प्रमुख रस्त्यांच्या कडेला हापूस आंब्याची विक्री मोठ्या प्रमाणात झाली. सध्या कोकणातून हापूस आंब्याची आवक होत आहे. पाडव्याला मागणी अधिक असल्याने बाजारात शेतकऱ्यांकडून आवकही मोठ्या प्रमाणात झाली होती. दोन दिवसात १७ हजार ८६९ बॉक्स व ५०० पेट्यांची विक्री झाली. बॉक्सचा सरासरी दर ३५० रुपये तर पेटीचा २५०० रुपये दर आहे. दर तेजीत असले तरी खरेदीही चांगली झाली.

परराज्यातील आंब्याची आवक कधी?

कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरातमधून आंब्याची आवक झालेली नाही. त्यामुळे बाजारात दर काहीसे तेजीत आहेत. येत्या आठवड्यात आंब्याची आवक वाढणार असल्याने दर कमी होईल.बाजार समितीत हापूस आंब्याची विक्री

| वार | विक्री | सरासरी दर |
|---|---|---|
| सोमवार - | १० हजार ९१ - | ४०० |
| मंगळवार - | ६ हजार ३५३ - | ३५० |



# अवकाळी पावसासह गारपिटीचा ३५ हजार हेक्टरला फटका



**अमरावती :** जिल्ह्यात शनिवारी रात्री झालेल्या वादळासह अवकाळी पाऊस, गारपिटीने ५२३ गावांमध्ये रबी गव्हासह फळपीक व भाजीपाला पिकाचे ३५३८९ हेक्टरमध्ये नुकसान झाल्याचा कृषी विभागाचा प्राथमिक अहवाल आहे.

यामध्ये सर्वाधिक २३६९२ हेक्टरमध्ये नुकसान चांदूरबाजार तालुक्यात झाले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी बाधित पिकांचे पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत.

या आपत्तीमध्ये उशिरा पेरणी झालेला व आता काढणीला आलेला १९७९ हेक्टरमधील गहू, ३८ हेक्टरमधील हरभरा, ६२६ हेक्टरमधील ज्वारी, २२९ हेक्टरमधील तीळ, १ हेक्टरमध्ये पपई, १८,२७० हेक्टरमधील संत्रा, ४४५ हेक्टरमधील केळी, ६ हेक्टरमध्ये आंबा व ९६ हेक्टरमधील इतर पिकांचे नुकसान झालेले आहे. या आपत्तीमध्ये भातकुली तालुक्यात ५२.३३ हेक्टर, चांदूर रेल्वे २७, धामणगाव १८८, अचलपूर ३९१८, अंजनगाव सुर्जी ३३८, दर्यापूर ३७८, मोर्शी ६७८७, चांदूरबाजार २३६९२ व अमरावती तालुक्यात १० हेक्टरमध्ये मोठे नुकसान झाल्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा प्राथमिक अहवाल आहे.

# कॉंग्रेसतर्फे धुळ्यातून डॉ. शोभा बच्छाव यांना उमेदवारी

**धुळे :** धुळे जिल्हयाच्या माजी पालकमंत्री डॉ. शोभा बच्छाव यांना कॉंग्रेसतर्फे धुळे लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर झाली. कॉंग्रेसने या मतदारसंघातून प्रथमच महिलेला उमेदवारी दिलेली आहे. त्यामुळे या मतदारसंघात आता कॉंग्रेस, भाजप व वंचित असा तिरंगी सामना रंगण्याची चिन्हे आहेत.

धुळे लोकसभा मतदारसंघातून कॉंग्रेसतर्फे धुळे जिल्हाध्यक्ष शाम सनेर यांच्यासह डॉ. तुषार शेवाळे, डॉ. शोभा बच्छाव यांच्या नावाची चर्चा अनेक दिवसांपासून सुरू होती. अखेर कॉंग्रेसने बुधवारी सायंकाळी डॉ. बच्छाव यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. डॉ. बच्छाव यांचे वडिल धुळ्यात शासकीय नोकरीला असल्याने, त्यांचे प्राथमिक शिक्षण धुळ्यात झालेले आहे. त्या नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्यातील पिंपळगाव वाखारी येथील रहिवासी असून, त्यांची सासरवाडी मालेगाव मध्य मतदारसंघातील सोनज येथील आहे.डॉ. बच्छाव या २००९ मध्ये धुळे जिल्हयाच्या पालकमंत्री होत्या. तर सध्या धुळे जिल्हा कॉंग्रेसच्या प्रभारी आहेत.

# उपनगरात मतदानासाठी शाईच्या २० हजार बाटल्या



**मुंबई :** मतदान प्रक्रियेत मतदारांच्या डाव्या हाताच्या अंगठ्याजवळील बोटाला शाई लावली जाते.उपनगर जिल्ह्यात लोकसभेच्या चारही मतदारसंघातील मतदान करणाऱ्या मतदारांच्या बोटांवर लावण्यासाठी शाईच्या २० हजार २६७ बाटल्यांची मागणी नोंदविण्यात आली असल्याची माहिती उपनगर जिल्हानिवडणूकअधिकारी तथा जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी येथे दिली.मुंबईउपनगर जिल्ह्यात एकूण ७२ लाख २८ हजार ४०३ मतदार आहेत. तर मतदान केंद्रांची संख्या सात हजार ३५३ एवढी आहे.

याशिवाय २७ सहाय्यकारी मतदान केंद्रे आहेत.मतदान प्रक्रियेत मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनी बोटाला शाई लावली जाते. ही शाई पुसली जाऊ नये म्हणून तिच्यावर प्रक्रिया केलेली असते. त्यामुळे मतदान प्रक्रियेच्या काही दिवसानंतरही ही शाई पुसली जात नाही.यामुळे एक मतदार एकदाच मतदान करू शकतो. ही शाई इंडेलिबल इंक म्हणून ओळखली जाते. मतदाराने मतदान केल्यानंतर मतदानासाठी नियुक्त अधिकारी मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर ही शाई लावतात. त्यानंतर अवघ्या काही सेकंदात ही शाई पूर्णपणे कोरडी होवून तिची बोटावर खूण उमटते. शाई लावलेले बोट पाण्याच्या संपर्कात आल्यावर या शाईचा रंग काळा होतो. हैदराबाद आणि म्हैसूर येथे या शाईची निर्मिती केली जातेअशी माहिती उपजिल्हानिवडणूकअधिकारी तेजस समेळ यांनी दिली.

# व्हिजन अकॅडमी म्हणजे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडवणारे संस्कारकेंद्र पत्रकार : चंद्रकांत भाट

**शिरोळ :** व्हिजन आयडॉल्स करिअर अकॅडमी म्हणजे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडवणारे संस्कार केंद्र असून भविष्यात या केंद्रातून महाराष्ट्राचे भावी वक्ते व उद्याचे सुजाण नागरिक घडतील असा विश्वास पत्रकार चंद्रकांत भाट यांनी व्यक्त केला.

येथील व्हिजन आयडॉल्स करिअर अकॅडमीच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. व्हिजन अकॅडमीचा प्रथम वर्धापनदिन गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर उत्साहात संपन्न झाला. यानिमित्त विविध क्षेत्रातील पुरस्कारप्राप्त मान्यवरांचा व स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.पद्माराजे विद्यालय ज्युनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य एस. एस.पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे स्वागत अकॅडमीच्या संयोजन समितीचे प्रमुख मेजर प्रा. के एम. भोसले यांनी केले. व्हिजन अकॅडमीचे संचालक ड.श्रीकांत माळकर यांनी प्रास्ताविक व पुरस्कारप्राप्त मान्यवरांचा परिचय करून दिला . यावेळी कोल्हापूरच्या संघर्ष मीडिया ग्रुपकडून पत्रकार चंद्रकांत भाट यांना आत्मसन्मान गौरव पुरस्कार जाहीर केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.तसेच सावित्रीच्या लेकी आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त सौ.जयश्री पाटील, शिरोळचे सुप्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. अतुल पाटील , जयसिंगपूरचे सुप्रसिद्ध वकील ड.श्रेणिक चौगुले, बँकॉक ( थायलंड ) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत सुवर्ण पदकप्राप्त स्केटिंगपटू कु.निवेदिता अमरसिंह शिंदे,कोल्हापूर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या महिला उपाध्यक्षा स्नेहल शिंदे, राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धेत यश मिळवलेले साहित्यिक किरण पाटील , यशवंत ब्रिगेड संघटनेच्या कोल्हापूर जिल्हा महिला अध्यक्षा मा.योगिता घुले , शिरोळ तालुका राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष दिग्विजय माने व विविध स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी सुप्रसिद्ध वक्ते ड.उदय मोरे , साहित्यिक किरण पाटील , डॉ. अतुल पाटील, सौ.जयश्री पाटील , सौ.स्नेहल शिंदे , दिग्विजय माने यांनी आपले मनोगत व्यक्त करून व्हिजन अकॅडमीच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्राचार्य एस. एस.पाटील यांनी अध्यक्षीय भाषणातून यशस्वी विद्यार्थ्यांचे व पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे कार्य सर्वांना प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास शिरोळ लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष सचिन माळी, माजी नगरसेवक पंडितराव काळे साहेब,सेवानिवृत्त शिक्षक दत्तात्रय कुंभार , मयूर ज्ञानप्रबोधिनीचे संचालक विक्रम भोसले , पत्रकार दत्तात्रय खडके,व्हिजन अकॅडमीचे व्यवस्थापक संजय माळकर व महेश कुंभार, राजू माळी सौ. जयालक्ष्मी कुंभार , सौ .गायत्री मुळीक ,सौ. अनुराधा माने,सौ. सारिका माने, सौ.स्मिता फल्ले , ,सुरेश फल्ले , सामाजिक कार्यकर्ते .विवेक फल्ले , मनोहर फल्ले, सौ.ज्योती फल्ले दिपाली फल्ले यांच्यासह शैक्षणिक ,सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील विविध मान्यवर ,विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# म्हैसाळजवळ १७ लाखाचा गुटखा, सुगंधी तंबाखू साठा जप्त ; सांगलीतील एकास अटक

**सांगली :** म्हैसाळ ते मिरज रस्त्यावर सुगंधी तंबाखू, गुटखा तस्करी करणारी पिकअप स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पथकाने पकडून १७ लाख ३० हजाराचा माल जप्त केला. पिकअपसह २५ लाख ८० हजाराचा मुद्देमाल जप्त करून मधुसुदन महेश मगदूम (वय २२, रा. हसनी आश्रम नजीक, श्रीरामनगर, विजयनगर सांगली ) याला अटक केली. याबाबत मिरज ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

अधिक माहिती अशी, स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पोलिस पथकाला म्हैसाळ ते मिरज रस्त्यावरुन एका पिकअपमधून शासनाने प्रतिबंधित केलेली सुगंधी तंबाखू आणि गुटखा यांनी



चोरुन विक्री करण्यासाठी वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी मंगळवारी सायंकाळी परिसरात सापळा लावला होता. सायंकाळी ५ च्या सुमारास पिकअप (एमएच ०८ एपी ५०४७) भरधाव वेगाने येताना दिसली. पोलिसांनी थांबण्याचा इशारा केल्यावर चालकाने रस्त्याकडेला वाहन थांबविले.

पोलिसांनी तपासणी केली असता आतमध्ये सुगंधी तंबाखू आणि गुटखा असल्याचे निदर्शनास आले. त्यासंदर्भात चालक मधुसूदन मगदूम याच्याकडे विचारणा केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. त्यामुळे पोलिसांनी कसून चौकशी केली.पोलिस चौकशीत चालक मगदूम याने कर्नाटकातील कुडची येथील प्रोपायटर पाटील ( पूर्ण नाव माहिती नाही) याच्या गोदामामधून भरण्यात आल्याचे निष्पन्न झाले. तसेच स्वप्नील प्रभाकर लुगडे (रा. समतानगर, गल्ली क्र. १४, मिरज ) याच्या सांगण्यावरुन हा माल तेथे भरुन समतानगर येथे पोहचविण्यात येणार असल्याची कबुली दिली. संशयित मगदूम याच्यावर मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस कर्मचारी संकेत मगदूम यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.निरीक्षक सतीश शिंदे, सहायक निरीक्षक सिकंदर वर्धन, कर्मचारी अमोल लोहार, आमसिद्ध खोत, अमोल ऐदाळे, अमर नरळे, संजय कांबळे, सोमनाथ गुंडे, सोमनाथ पतंगे, रोहन घस्ते, सुनिल जाधव, सूरज थोरात, कॅप्टन गुंडवाडे यांच्या पथकाने कारवाई केली.

दोन दिवसात मोठी कारवाई-

अंकली फाट्यावर १४ लाख ८१ हजाराची सुगंधी तंबाखू, गुटखा, पानमसाला याचा साठा सांगली ग्रामीण पोलिसांनी जप्त केला होता. त्यानंतर गुन्हे अन्वेषणच्या पथकाने म्हैसाळजवळ १७ लाख ३० हजाराचा साठा जप्त केला

# अवकाळीचा तडाखा!

## ४ हजार ६० हेक्टरवरील शेतीपिकांचे नुकसान



**अकोला :** दोन दिवसांपासून अवकाळी पावसाने जिल्ह्याला झोडपले असून, ७४ गावांमधील ४ हजार ६० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. मंगळवार, बुधवारी झालेल्या अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील पाच तालुक्यात फटका बसला आहे. त्यात सार्वाधिक नुकसान पातूर तालुक्यात झाले आहे. जिल्हा प्रशासनाच्या अहवालानुसार, ५५ घरांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त भागात पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.सध्या शेतशिवारात रब्बीचे पिके सोंगणीला आले असून, उन्हाळी पिके बहरलेली आहेत. दरम्यान अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे कांदा, मका, ज्वारीसह लिंबू, फळबागांना फटका बसला आहे. गतवर्षी खरीप हंगामात नुकसान झाले, त्यानंतर रब्बी हंगामात हातातोंडाशी आलेला घास हिरावल्या गेल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. जिल्ह्यात ८ व ९ एप्रिल रोजी झालेल्या अवकाळी पावसाने गहू, ज्वारी, कांदा, मका, फळपीक, केळी भाजीपाला आदी पिकांचे नुकसान झाले आहे.

**७४ गावांत असे झाले नुकसान**

**तालुका - गावे - नुकसानग्रस्त क्षेत्रबार्शीटाकळी - ०३ - ५ हेक्टर**

**तेल्हारा - ३१ - ९२९ हेक्टरबाळापूर - १२ - २५० हेक्टर**

**पातूर - २४ - २ हजार ८६६ हेक्टर मूर्तिजापूर - ०४ - १० हेक्टर**

# आ. राजेश पाटील यांची कसोटी; खा. महाडिक यांना गडहिंग्लज उपविभागात चांगलेच आव्हान!

**राजदंड / गडहिंग्लज**

**कोल्हापूर लोकसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीकडून शाहू महाराजांची उमेदवारी जाहीर झाली, तर महायुतीतून खासदार संजय मंडलिक यांना अखेर तिकीट मिळाले आहे. चंदगड गडहिंग्लज विधानसभा मतदारसंघात गेल्या वेळचे सोबती आत्ता विरोधात गेल्याने लोकसभा निवडणुकीत शाहू महाराज की, मंडलिक याचा फैसला गडहिंग्लज उपविभागातील मतदार करणार असल्याने सर्वाच्या नजरा गडहिंग्लज उपविभागावर खिळल्या आहेत.**

चंदगड विधानसभा मतदारसंघात खा. मंडलिक यांचे मेहुणे आ. राजेश पाटील यांच्यासमोर मागील २०१९ च्या निवडणुकीपेक्षा या निवडणुकीत खा. मंडलिक यांना मताधिक्य देण्याचे फार मोठे आव्हान उभे ठाकले आहे. गतवेळी आ. सतेज पाटील यांनी आपली यंत्रणा चंदगड, गडहिंग्लज, आजरा तालुक्यात लावली होती. शिवसेनाही एकसंध पणे मंडलिकांसोबत होती. जनता दलानेही मंडलिकांना साथ दिली होती. यावेळेस चित्र उलटे आहे.

सध्या अनेक नेतेमंडळी खा. मंडलिक यांच्या विरोधात गेली आहे. आ. राजेश पाटील यांना मंडलिक यांना चंदगडमधून मताधिक्य देऊन आपली ताकद दाखवावी लागणार आहे. संग्रामसिंह कुपेकर यांनी खा. मंडलिक यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. मात्र सध्या तरी त्यांनी बचावात्मक पवित्रा घेत मंडलिक यांच्याबरोबर जुळवून घेणे पसंद केले आहे. खा. मंडलिक यांनी माजी मंत्री भरमू पाटील, शिवाजी पाटील यांच्याशी संपर्क साधून मदत मागितली आहे.

गेल्या निवडणुकीवेळी आ. सतेज पाटील यांनी 'आमचं ठरलंय'चा नारा देत मंडलिक यांना मदत केली होती. त्यावेळी चंदगड मतदारसंघातून जनता दल, गोपाळराव पाटील यांच्यासह अन्य काही प्रमुख घटकांनी मदत केली होती. याशिवाय उद्धव ठाकरे यांनीही खास प्रचार सभा घेत शिवसेनेची ताकद त्यांच्यासोबत लावली होती. यावेळेस मंडलिक शिंदेशाही शिवसेनेचे उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे शिवसेनेचा ठाकरे गट जोरदार विरोध करणार यात शंका नाही. ठाकरे गटाचे सुनील शिंत्रे यांचा विरोध होण्याची शक्यता आहे.

चंदगड मतदासंघातून मंडलिक यांना धनंजय महाडिक यांच्यापेक्षा ५१ हजारांचे मताधिक्य मिळाले होते, तर त्यापूर्वीच्या २०१४ च्या निवडणुकीतही मंडलिक यांना १९ हजार मतांची आघाडी मिळाली होती. मंडलिक यांना चंदगड मतदारसंघाने नेहमीच साथ दिली असून, या निवडणुकीत आ. राजेश पाटील यांना मंडलिक यांचे मताधिक्य टिकवणे आव्हानात्मक आहे.

गतवेळची काँग्रेसचे नेतेमंडळीं या निवडणुकीत खा. मंडलिक यांच्याविरोधात गेलीआहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आ. राजेश पाटील यांच्यासोबत भाजपचे भरमू अण्णा पाटील, शिवाजी पाटील, अशोक चराटी आदी नेतेमंडळी आहेत. शिंदे गटाच्या शिवसेनेची ताकद गडहिंग्लज उपविभागात कमी आहे. या उलट काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद अधिक आहे. त्याचा लाभ शाहू महाराज यांना होऊ शकतो.



### चंदगडमधील २०१९ च्या मतांचे बलाबल

- एकूण मतदान ३ लाख १५ हजार ९०
- संजय मंडलिक – १ लाख २० हजार ८५७
- धनंजय महाडिक – ७० हजार ७२६
- मंडलिकांचे मताधिक्य – ५१ हजार ९९१

### दोन ताई अणि आप्पी पाटील शाहू महाराजांसोबत

**बाबासाहेब कुपेकर यांच्या कन्या डॉ. नंदाताई आणि श्रीपतराव शिंदे यांच्या कन्या स्वातीताई यांच्यासह कर्नाटकातील बडे राजकीय प्रस्थ जारकीहोळी यांचे नातेवाईक विनायक तथा आप्पी पाटील यांनी शाहू महाराज यांना पाठिंबा दिल्याने येथील राजकीय पटलावर धमाका उडाला आहे.**

### नरके रिंगणात उतरल्यास उमटणार पडसाद

**चेतन नरके रिंगणात उतरणार असल्याचे संकेत मिळत आहेत. जर नरके निवडणुकीच्या रिंगणात आले तर गोकुळ दूध संघाच्या माध्यमातून राजकीय घडामोडी होण्याची शक्यता आहे. करवीर, पन्हाळा तालुक्यातील राजकीय पटलावर धमाका उडाला तर त्याचे पडसाद गडहिंग्लज उपविभागात चांगलेच उमटण्याची शक्यता आहे. अरुण नरके यांचे विश्वासू सहकारी या विभागात सक्रिय आहेत.**

# सातारच्या गांधी मैदानावर साकारली महारांगोळी

## बलिदान दिनानिमित्त अनोखे मानवंदना




**राजदंड / सातारा**

स्वराज्य संस्थापक श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांचे सुपुत्र धर्मवीर श्री श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज यांचा पुण्यतिथी महोत्सव सातारा येथे मोठ्या अभिमानाने छत्रपती श्री शिवप्रतिष्ठानचे मावळे साजरा करतात. बलिदान मास म्हणून सुमारे महिनाभर फाल्गुन शुद्ध अमावसेपर्यंत दररोज धर्मवीर संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन त्यांचे गुणगान करणारी कवने, पोवाडे, शाहिरी गीते व आरती करून अभिवादन करतात.

सोमवारी गांधी मैदानावर या बलिदान मासाची सांगता धर्मवीर संभाजी महाराजांचे पूर्णाकृती पुतळ्याचे पूजन करून गांधी मैदानावर ५४ फूट उंच आणि ३४ फूट अरुंद अशा आकारातील महारांगोळी अनुप दळवी व शिवप्रतिष्ठानच कार्यकर्त्यांनी काढून धर्मवीर संभाजी महाराजांना एक अनोखे अभिवादन केले आहे. दरम्यान सातारा शहरातून या बलिदान दिनाचे औचित्य साधून सायंकाळी गांधी मैदानावरून मूकपदयात्रा काढून संभाजी महाराजांना या पदयात्रेतून मशाली उजळत अभिवादन करण्यात आले.

या बलिदान दिनाचे औचित्य साधून सातारा शहरातील गांधी मैदानावर दोन दिवस धारकर यांनी स्वच्छता मोहीम राबवली. रविवारी रात्री नऊ वाजता सुरू केलेली महारांगोळी तब्बल १२ तासांचा अवधी घेत पूर्ण झाली. अतिशय सुरेख, विविध रंगातील देखणे धर्मवीर संभाजी महाराजांचे चित्र रेखाटून एक अनोखी अभिवादनाची पद्धत सातारकरंनी मराठी माणसांपुढे ठेवल्याचे विशेष कौतुक होत होते. ही महा रांगोळी पाहण्यासाठी शहरातूनच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातून नागरिक मोठ्या संख्येने रात्री उशिरापर्यंत राजवाडा परिसरात येऊन या कलाकृती सादर करणाऱ्या कलाकारांचे विशेष कौतुक करत होते.

# डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीदिनी साताऱ्यात 'एक वही - एक पेन' अभियान

## अरुण जावळे यांची माहिती

**राजदंड / सातारा**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती दिन सर्वत्र उत्साहात उत्साहात साजरा केला जातो. हा दिवस भारताच्या दृष्टीने नवी पिढी घडवणारा, नवनिर्माणाचे स्वप्न मुलांच्या मन, मेंदू अन् मनगटात सळसळत ठेवणारा आहे. म्हणूनच यादिवशी 'एक वही-एक पेन अभियान' राबवून महामानवास अभिवादन केले जाणार आहे, अशी माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिन तथा विद्यार्थी दिवसाचे प्रवर्तक अरुण जावळे यांनी दिली.



याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच साताऱ्यात अनेक वर्षे वास्तव्य राहिले आहे. त्यांचे शालेय शिक्षण येथेच झाले. त्यांच्या मातोश्री भीमाई यांचे निधन ही साताऱ्यात झालेय. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सातारा हे ऋणानुबंध ऐतिहासिक आहेत. १४ एप्रिल रोजी या सर्व ऐतिहासिक घटनांना उजाळा मिळतो. शिवाय महामानवास अभिवादन करण्यासाठी जिल्ह्याच्या कोनाकोपऱ्यांतून अनुयायी साताऱ्यात येत राहतात. या महामानवाची ओळख 'सिम्बॉल ऑफ नॉलेज' अशी आहे. म्हणूनच दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी 'एक वही-एक पेन' या अभियानाच्या माध्यमातून महामानवाला अभिवादन केले जाणार आहे. येणाऱ्या अनुयायांनी येताना हारफुले घेऊन न येता वही आणि पेन सोबत आणावे व ते अर्पण करून अभिवादन करावे, असे आवाहन अरुण जावळे यांनी केले आहे.

### अभिनव उपक्रमात सहभागी व्हा!

**जे अनुयायी वही, पेन घेऊन येतील त्यांच्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर येथे रविवार, दि. १४ एप्रिल रोजी अर्थात जयंतीदिनी सकाळी ९ ते रात्री १२ यावेळेत शैक्षणिक साहित्य स्वीकारले जाईल. शाळाबाह्य मुलांना शाळेत आणावयाचे असेल, त्यांना शिक्षणाची गोडी लावून शालेय शैक्षणिक चळवळ गतिमान करायची असेल तर या अभिनव उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन अरुण जावळे यांनी केले आहे.**

# सिव्हील हॉस्पिटलसमोरून दुचाकीची चोरी

**राजदंड / सातारा**

साताऱ्यातील सिव्हील हॉस्पिटलच्या पार्कींगमधून अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरुन नेल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सिव्हील हॉस्पिटलच्या पार्कींगमधून अज्ञात चोरट्याने एमएच ११ बीजे ०६१० या क्रमांकाची दुचाकी चोरुन नेली. याप्रकरणी सुभाष दिलीप बडदे (वय ३०, रा. बोरगाव ता.कोरेगाव) यांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

ही घटना दि. ७ एप्रिल रोजी घडली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान, सिव्हील हॉस्पिटलसमोरून वारंवार दुचाकींची चोरी होत असल्याचे दिसत आहे.

# कोरेगावात ३५ हजार ४७४ रूपयांचा गुटखा, पान मसाला ताब्यात

**राजदंड / कोरेगाव**

कोरेगाव येथे सातारा येथी अन्न व औषध प्रशासन विभागाने टाकलेल्या धाडीत शासनद्वारा प्रतिंबधित केलेला ३५४७४/- रुपये किमतीचा गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखुवर धडक कारवाई. प्रतिबंधित पदार्थाची विक्री व वितरण करण्याच्या उद्देशाने कब्जात साठवण केल्याप्रकरणी संशयित विकास हनमंत यादव रा. कुमठे याच्या विरोधात कोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. याप्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन अधिकारी श्रीमती प्रियांका नामदेव वाईकर यांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

सातारा येथील अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन अधिकारी श्रीमती प्रियांका नामदेव वाईकर व त्यांच्या पथकाने ३५ हजार ४७४ रुपयांचा महाराष्ट्र शासनद्वारा प्रतिंबधित केलेला गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखु, तसेच इतर कोणत्याही नावाने संबोधली जाणारी तत्सम उत्पादनाचे विक्री व वितरण करण्याच्या उद्देशाने कब्जात साठवण केल्याप्रकरणी कारवाई केली.

अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने दिलेल्या फिर्यादीवरून कोरेगाव पोलिसांनी संशयित आरोपी विकास हनुमंत यादव राहणार कुमटे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### कोरेगावात अन्न औषध प्रशासन विभागाची धडक कारवाई

# मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी साताऱ्यात १३ एप्रिलला 'मानवी साखळी'

- तरुण, खेळाडू, नागरिक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सहभाग राहणार

**राजदंड / सातारा**

लोकसभा निवडणुकीत मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने विविध पातळीवर प्रयत्न सुरू असून आता १३ एप्रिलला 'मानवी साखळी' तयार करुन आवाहन करण्यात येणार आहे. यामध्ये तरुण, खेळाडू, नागरिक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सहभाग राहणार आहे. हा उपक्रम सर्व तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी होणार आहे.

सातारा लोकसभा मतदारसंघाची निवडणूक जाहीर झालेली आहे. यासाठी ७ मे रोजी मतदान होणार आहे. तसेच माढा लोकसभा मतदारसंघातही सातारा जिल्ह्यातील दोन विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासनाच्या वतीने विविध पातळीवर प्रयत्न केले जात आहे. यासाठी मतदारांत जनजागृती केली जात आहे. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी १३ एप्रिलला सकाळी ७ ते ९ या वेळेत जिल्ह्यातील सर्व तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी 'मानवी साखळी'चे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये तरुणवर्ग, खेळाडू, महाविद्यालयीन विद्यार्थी, स्वयंसेवक, शासकीय-निमशासकीय अधिकारी, कर्मचारी, सर्व वयोगटातील नागरिक आदींचा सहभाग घेण्यात येणार आहे.

### भारताचा नकाशा तयार करणार

**या मानवी साखळीत भारताचा नकाशा तयार करण्यात यावा अशा सूचना आहेत. भारताचा नकाशा तयार करताना मानवी साखळीच्या दोन ओळी असाव्यात. यामध्ये भारताचा राष्ट्रीय ध्वजच्या तिरंगामधील रंगाचा वापर करावा. प्रत्येक व्यक्तीने पांढरा शर्ट घातलेला असावा, संपूर्ण नकाशाभोवती चारही बाजुंनी विद्याऱ्श्यांच्या निळ्या रंगाच्या टोप्या घातलेल्या एक ओळीने चौरस तायार करावा, अशा काही सूचना करण्यात आलेल्या आहेत.**

# खासदारांची गत 'दीड दिसात अन् कोल्ह उसात'

## राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या युवती प्रदेशाध्यक्षा सक्षणा सलगर यांची टीका

**राजदंड / सातारा**



माढ्याच्या खासदारांची दीड दिसात अन् कोल्ह उसात, अशी गत झाली आहे. मी माढ्यात दहा दिवस दौरा केला. सांगोला, माळशिरस, नातेपुते, करमाळा, टेंभुर्णी याठिकाणी जाऊन आले. लोकांशी बोलले. यावेळी खासदार काळा की गोरा ते माहीत नाही. मोदींच्या नावावर मतं घेऊन गेले ते तिकडेच. मोदींच्या हवेत सगळे खासदार झालेत. कोणीच कामाचे नाहीत, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या युवती प्रदेशाध्यक्षा सक्षणा सलगर यांनी रणजितसिंह निंबाळकर यांचा समाचार घेतला.

सातारा येथे राष्ट्रवादी भवनात आयोजित असंघटित कामगारांच्या मेळाव्यात त्या बोलत होत्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे जिल्हाध्यक्ष सुनील माने, सातारा-जावळीचे नेते दीपक पवार, कविता म्हेत्रे, संजना जगदाळे, संगीता साळुंखे, समिंद्रा जाधव, रमेश उबाळे, असंघटित कामगार सेलचे जिल्हाध्यक्ष संतोष ननावरे आदी उपस्थित होते.

### कोल्हापुरातून पळून पुण्यात डल्ला

**सक्षणा सलगर म्हणाल्या, 'पैलवानांचं शहर अशी कोल्हापूरची ख्याती आहे. परंतु, चंद्रकांत पाटील यांनी कोल्हापुरातून पळून येत पुण्यातल्या एका महिलेच्या तयार मतदारसंघात डल्ला मारला. आता ते भल्याभल्यांना लोळवलेल्या वस्तादाला आव्हान देत आहेत, असेही त्या म्हणाल्या.**

# पसरणी घाटात वणवा; नागरिकांच्या सतर्कतेने वाचली वनसंपदा

**राजदंड / पाचगणी**

शनिवारी रात्री पसरणी घाटात साडेआठच्या सुमारास लागलेल्या वणवा विझविणाऱ्या दोन हातांना आठ हातांचे बळ मिळाल्याने वणवा बघता बघता दहा हातांनी वणवा विझला. ही मात्र अंधाऱ्या रात्री डहाळ्या हाती घेवून विझविणाऱ्या दहा हातांची कमाल होती. या दहा हातांचे सद्या सर्वत्र कौतुक होत आहे.

पाचगणी-वाई रस्त्यावर पसरणी घाटात शनिवारी रात्री साडेआठ सुमारास नुकताच वनव्याने पेट घेतला होता. यावेळी आपली ड्युटी संपवून घराकडे जाणाऱ्या सातारा पोलिस गोपनीय यंत्रणेतील भरत जाधव यांनी वणवा पहातच तत्परतेने गाडी थांबवून झाडांच्या डहाळ्या हाती घेत अंधाऱ्या रात्री वणवा विझविण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यांना वणवा विझविताना पाहून रस्त्याने दुचाकीवरून जाणाऱ्या आदित्य जावळे, नरेंद्र चूनाडे, पाचगणी, प्रवीण काकडे, राहुल हागिर, रविवार पेठ वाई, यांनी हे दृश्य पाहून वणवा विझविण्यासाठी सरसावले. युवकांनी मदत केल्याने वणवा विझविण्याचे प्रयत्न सार्थकी लागले.

दोन हातांच्या मदतीला आठ हात धावल्याने वणवा आटोक्यात आला. यामुळे पसरणी घाटातील वनसंपदा वणवा ज्वाळांच्या भक्ष्यस्थानी पडण्यापासून वाचली याचे श्रेय या दहा हातांना जाते. यांनी जीवाची पर्वा न करता या वनव्यावर नियंत्रण मिळविल्याने आग आटोक्यात आणली गेली. याचे सर्वत्र पर्यावरण प्रेमी, आणि नागरिक यांच्याकडून कौतुक होत आहे.

### परिस्थितीची जाणीव ठेवणार का?

**एरव्ही वणव्यात होरपनाळी वनसंपदा दिसत असूनही शेजारून निघून जाणारी लोक आपण पहातो. मात्र येथे अंधाऱ्या रात्री आपला जीव धोक्यात घालून वणवा विझविनारी सुद्धा दुसऱ्या बाजूला आहेत. याचे मोठे अफ्रुफ वाटल्याशिवाय राहत नाही. काडी टाकणारा टाकून जातो. त्यानंतर उद्भवणारी परिस्थितीची मात्र त्याला जाणीव नसते.**



**"हा वणवा विझविण्यासाठी समाज प्रबोधनकार भरत जाधव व सहकाऱ्यांनी दाखविलेली तत्परता नक्कीच कौतुकस्पद आहे. याची प्रेरणा घेतली तर वनसंपदेच रक्षण नक्कीच होईल.**

**– प्रशांत डोंगरे, पर्यावरणप्रेमी, वाई**

# वीजदरवाढीने यंत्रमाग व्यवसाय अडचणीत

## महाराष्ट्रात सर्वाधिक दर : उद्योग बंद पडण्याची भीती

**राजदंड / विटा**


संपूर्ण देशाच्या तुलनेत महाराष्ट्रात वीज दर सर्वात जास्त आहे. त्यातच यावर्षी पुन्हा लादलेल्या दरवाढीने छोट्या मोठ्या उद्योगांसह यंत्रमाग व्यवसाय बंद पडण्याची शक्यता आहे, अशी भीती व्यवसायिकांच्या व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या बहुवार्षिक वीजदरवाढ मंजुरीनुसार चालू आर्थिक वर्षात पुन्हा ७ ते ८ टक्के दरवाढ लागू झाली आहे. यापूर्वी २०२२ -२३ या आर्थिक वर्षात महावितरणची वीज देयक मागणी वार्षिक ९० हजार कोटी रुपये होती. त्यात या बहुवार्षिक दरवाढ मंजूरीनंतर, २०२३-२४ या वर्षात महावितरणने १ लाख ७ हजार कोटी रुपयांची देयक मागणी आणि वसुली केली. तर आता १ एप्रिल २४ पासून सुरु झालेल्या २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी तब्बल १ लाख १५ हजार कोटी रुपये देयक मागणीस मंजूरी मिळाली आहे. यानुसार इथून पुढे सरासरी ७.५० ते ८ टक्के वीज दर वाढ लागू झाली आहे, परिणामी वीज आकार आणि वहन आकारामध्ये ६ ते १२ टक्के तर स्थिर आकारात १० टक्के दरवाढ झाली आहे.

मार्च २४ अखेरीस सरासरी वीज दर ८ रुपये ४६ पैसे प्रती युनिट होता, तो आता एप्रिल २४ पासून ८ रुपये ९४ पैसे झाला आहे. शिवाय इंधन समायोजन आकाराच्या नावाखाली होत असलेली ३५ पैसे प्रती युनिटची अप्रत्यक्ष दरवाढ अगोदरच लागू केली आहे. या समायोजन आकारासह राज्यातील सरासरी वीज देयक मागणी दर आता तब्बल ९ रुपये २९ पैसे प्रती युनिटपर्यंत पोहचला आहे. त्यामुळे अगोदरच अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून जात असलेल्या वस्त्रोद्योगातील सूत गिरण्यांच्या वीज दरात सरासरी ३५ ते ४० पैसे दरवाढ होणार आहे. परिणामी २५ हजार चात्यांच्या एका गिरणीला मासिक ५ लाख आणि वार्षिक ६० लाखाचा अतिरिक्त भुर्दंड बसणार आहे. शिवाय इंधन समायोजन आकाराच्या माध्यमातून होत असलेली दरवाढ तेवढीच अतिरिक्त आहे. याचा थेट फटका यंत्रमाग लघुउद्योगासही बसणार आहे.

### व्यवसाय आणखी संकटात...

**सध्या २७ अश्वशक्ती खालील ग्राहकांना २५ ते ३० पैसे तर त्यावरील ग्राहकांना ३०ते ३५ पैसे युनिटला दरवाढ करण्यात आली आहे. अगोदरच नुकसानीत असलेला यंत्रमाग व्यवसाय या वीज दरवाढीने आणखी संकटात येऊन बंद पडण्याची शक्यता आहे. एका बाजूला कर्नाटकसारखे राज्य वीज दर कमी करण्याचे धोरण राबवित असल्याची माहिती समोर येत आहे.**





**"राज्यात मात्र हतबल वीज नियामक आयोग आणि महावितरणचा गलथान कारभार तसेच प्रचंड वीज चोरी– गळतीची कारणे सांगत दरवर्षी करत असलेली दरवाढ ही महाराष्ट्राला औद्योगिक दृष्ट्या मागे घेऊन जाणारी ठरत आहे. मात्र, राज्यकर्ते यात काहीच हस्तक्षेप न करता केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत, ही अत्यंत गंभीर आणि चिंतेची बाब ठरत आहे.**

**– किरण तारळेकर, अध्यक्ष, विटा यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्था, विटा**

# माजी सरपंचाच्या फळबागेला दुसऱ्यांदा आग

- समाजकंटकावर तातडीने कारवाई करण्याची मागणी

**राजदंड / पाटण**

केर गावचे माजी सरपंच जगदीशसिंह उर्फ बाळासाहेब पाटणकर यांच्या फळबागेला अज्ञात इसमाने दुसऱ्यांदा आग लावली. या आगीत आंबा, जांभूळ, फणस आदी झाडांसह शेती साहित्याचे ६० हजार रुपयांचे नुकसान झाल्याची तक्रार पाटणकर यांनी पाटण पोलिसात दिली आहे. एका महिन्यात पाटणकर यांच्या फळबागेला दोन वेळा अज्ञात इसमाने आग लावल्याचा प्रकार घडला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, केर येथील माजी सरपंच जगदीशसिंह उर्फ बाळासाहेब पाटणकर यांच्या सर्वे नंबर ९३ मधील सागवानाची १० झाडे, आंबा ५, जांभूळ १२ झाडांसह शेतीसाठी आवश्यक मंचिंग पेपर शंभर फूट व शेतातील झोपडीत असणारे शेती साहित्य अज्ञाताने लावलेल्या आगीत भस्मसात झाले असून त्यांचे सुमारे ६० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. गेल्या काही दिवसांपूर्वीच पाटणकर व आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या फळबागेला आग लागून सुमारे ५१ लाख रुपयांचे नुकसान झाले होते. त्यावेळीही अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल होता. पुन्हा याच शेतकऱ्याच्या बागेला आग लावण्यात आली आहे. त्यामुळे पोलीस व वनविभागाने याची गांभीर्याने दखल घेऊन समाजकंटकावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# रामेश्वरम कॅफे बॉम्बस्फोट प्रकरणी भाजपा कार्यकर्त्याला अटक

## संशयितांशी संबंध असल्याचा दावा




**बंगळुरू :** कर्नाटकची राजधानी बंगळुरू येथील रामेश्वर कॅफेमध्ये १ मार्च रोजी बॉम्बस्फोट झाला होता. आरोपीने कॅफेमध्ये स्फोटकांनी भरलेली बॅग ठेवली आणि त्यानंतर आरोपी तिथून निघून गेला होता. या स्फोटामध्ये १० लोक जखमी झाल्याची माहिती समोर आली होती. या स्फोटाचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून सुरू होता. सुरुवातीला या प्रकरणात 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया'शी (पीएफआय) संबंधित एकाला अटक करण्यात आली होती. त्यानंतर आता एनआयएने साई प्रसाद नावाच्या भाजपा कार्यकर्त्याला अटक केली आहे, अशी बातमी इंडिया टुडे या संकेतस्थळाने सुत्रांच्या हवाल्याने दिली आहे.

साई प्रसादला आता चौकशीसाठी एनआयएने ताब्यात घेतले आहे. या स्फोटाशी संबंधित दोन संशयितांचा आणि त्याचा काही संबंध आहे का? याबद्दल चौकशी केली जात आहे. मागच्या आठवड्यात एनआयएने शिवमोग्गा जिल्ह्यात काही ठिकाणी धाडी टाकल्या होत्या. त्यामध्ये आरोपीचे मोबाइल दुकान आणि इतर दोन संशयितांच्या घरावर धाड टाकली होती.

रामेश्वर कॅफेमध्ये काय घडले होते?

बंगळुरुच्या व्हाइटफिल्ड परिसरात स्थित असलेला रामेश्वर कॅफे शहरात लोकप्रिय आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित आरोपीने कॅफेमध्ये बॅग सोडली. नाश्ता केल्यानंतर तो बॅग तिथेच सोडून निघून गेला. त्यानंतर बॉम्बस्फोट झाला.

सीसीटीव्ही व्हिडिओमध्ये काय दिसले?

संशयित आरोपीने मास्कने आपला चेहरा झाकलेला असल्याचे सीसीटीव्ही चित्रणात दिसत होते. तसेच त्याने चष्मा घातलेला असून डोक्यावर टोपी होती. कॅफेत आल्यानंतर त्याने रवा इडलीची ऑर्डर दिली, आपली ऑर्डर घेऊन जातानाही तो सीसीटीव्हीमध्ये दिसत आहे. शुक्रवारी (दि. १ मार्च) दुपारी १२.५० ते १ वाजण्याच्या सुमारास हा बॉम्बस्फोट घडला. या दुर्घटनेत १० लोक जखमी झाले.

या स्फोटानंतर कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी माध्यमांना माहिती देताना सांगितले की, सीसीटीव्हीच्या मदतीने आरोपीला शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे. चेहरा ओळख प्रणालीद्वारे आरोपीचा शोध घेतला जात आहे. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक अंदाजानुसार आरोपीचे वय २५-३० असल्याचे सांगितले जाते. वरिष्ठ तपास अधिकाऱ्यांनी सांगितले की, आरोपी एका बसमधून कॅफेजवळ उतरल्याचे दिसत आहे. कॅफेमध्ये इडली विकत घेण्यासाठी त्याने रोकड दिली होती. इडली खाल्ल्यानंतर तिथेच आपली बॅग सोडून जाताना तो दिसत आहे. कॅफेमध्ये त्याने सात मिनिटं घालवली.

# मतदानाचा विक्रम आणि पुन्हा नरेंद्र मोदीच पंतप्रधान

**दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेली 'मैं भी चौकीदार' घोषणा भारतीय जनमानसाला खूपच भावली. देशातील नागरिकांच्या संपत्तीचे रक्षण करण्याकरिता, ती भ्रष्टाचाऱ्यांच्या हाती जाऊ न देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे नरेंद्र मोदी भारतीय जनतेच्या मनात बिंबवू पाहात होते. सर्व भाजप नेते आणि कार्यकर्त्यांनी सोशल मीडियावर मैं भी चौकीदार स्टेटस ठेवले होते. राफेल विमानांच्या खरेदीत भ्रष्टाचार झाल्याचे म्हणत काँग्रेस आणि विरोधी पक्षांनी 'चौकीदार चोर है' चीं घोषणा दिली होती, त्याला भाजपने 'मैं भी चौकीदार'ने उत्तर दिले होते. त्यामुळे ही घोषणा काँग्रेसवरच उलटली. पुलवामा आत्मघातकी हल्ला आणि भारताने केलेल्या सर्जिकल स्ट्राईकचा भाजपने या निवडणुकीत फायदा उचलला. सर्जिकल स्ट्राईकमुळे देशभरात भाजपबाबत विशेषत: नरेंद्र मोदींबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले होते. यातच काँग्रेसच्या काही नेत्यांनी सर्जिकल स्ट्राईकचे पुरावे मागितल्याने जनता काँग्रेसवर आणखीनच नाराज झाली. आणि मोदी लाट आणखी मोठी झाली.

नरेंद्र मोदी यांनी केलेल्या नोटबंदीनंतर काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी नोटबंदीचा गोरगरीबांवर होत असलेल्या परिणामांवरून भाजपला खिंडीत पकडण्याचा प्रयत्न केला होता. भाजप भ्रष्टाचार करीत असल्याचा प्रचारही सोनिया, राहुल गांधींसह सर्वच विरोधी पक्षाच्या नेत्यांनी मोठ्या प्रमाणावर केला. मात्र नोटबंदीमुळे भ्रष्टाचारी नेत्यांकडील पैसा वाया जात असल्याने सामान्य जनता मात्र नोटबंदीवर खुश होती. बँकेत नोटा



बदलण्यासाठी रांगा लागत असल्या तरी त्याबद्दल कोणी तक्रार केली नाही. फक्त विरोधकच याबाबत आरडाओरडा करीत होते. खरे तर विरोधी पक्षाकडे फसलेली अच्छे दिनची घोषणा, बेरोज़गारी असे अनेक मुद्दे होते. २०-२२ पक्षांची विरोधी आघाडी होती पण त्यांचा एक असा कोणी सक्षम नेता नव्हता. त्यातच मोदींच्या समोर कोण असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला होता. राहुल गांधींना कोणीही गंभीरतेने घेत नव्हते. भाजपने २०१४ प्रमाणेच आक्रमक प्रचार नीतीचा वापर केला आणि जास्तीत जास्त मतदारांपर्यत पोहोचून आपले स्थान बळकट केले.

दुसरी गोष्ट मुस्लिम मतदारांची. काँग्रेस मुस्लिम मतांना आकर्षित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत असते. परंतु २०१९ च्या निवडणुकीत मुस्लिम मतांबाबत कोणीही काहीही वक्तव्य केले नाही. मुस्लिम नेते आणि मुस्लिम समाजाच्या संघटना या निवडणुकीत शांत होत्या. त्यांनी कोणतीही मागणी या निवडणुकीत केली नाही. मुस्लिमांचे मुद्दे कोणत्याच राजकीय पक्षांच्या अजेंड्यावर नव्हते. आपण जर मुस्लिमांविषयी बोललो तर मतांचे ध्रुवीकरण होऊन भाजपलाच त्याचा फायदा होईल या भीतीने काँग्रेससह सर्वच विरोधी पक्ष मुस्लिम आघाडीवर गप्प होते.

विस्कळीत विरोधी पक्ष आणि नवमतदारांना आपल्याकडे खेचून घेण्यात यशस्वी ठरल्याने भाजपने लोकसभेतील संख्याबळाचा सगळ्यात मोठा विजय प्राप्त केला. २०१४ पेक्षाही नरेंद्र मोदींच्या यशाची टक्केवारी खूपच पुढे गेली होती. भाजपला ३०३ जागांवर विजय मिळाला जो स्वप्नवत होता. भाजप पुन्हा एकदा इतके प्रचंड यश मिळवेल असे कोणालाही वाटले नव्हते. पण जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदींवर विश्वास ठेवला आणि त्यांना पुन्हा एकदा सत्ता दिली. या निवडणुकीत ६७.११ टक्के मतदान झाले होते. तर २०१४ मध्ये मतदानाची टक्केवारी ६६.४० टक्के होती. काँग्रेसच्या कामगिरीत २०१४ पेक्षा थोडीशी सुधारणा झाली. २०१४ मध्ये ४४ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसला या निवडणुकीत अर्धशतक मारता आले. काँग्रेसचा ५२ जागा मिळाल्या. मात्र काँग्रेसच्या राहुल गांधी यांना पराभवाचा सामना करावा लागला. राहुल गांधी काँग्रेसच्या परंपरागत उत्तर प्रदेशच्या अमेठी मतदारसंघातून निवडणुकीला उभे होते. त्यांच्यासमोर भाजपने स्मृती इराणींना उतरवले होते. अमेठीत पराभव होईल असा अंदाज आल्याने राहुल गांधींना केरळच्या वायनाड या सुरक्षित मतदारसंघातूनही निवडणूक अर्ज भरला. अमेठीतून राहुल गांधींचा पराभव झाला पण वायनाडमध्ये विजय मिळाल्याने राहुल गांधी संसदेत पोहोचू शकले. त्यानंतर झालेल्या काँग्रेस का?कारिणीच्या बैठकीत राहुल गांधी यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्यामुळे सोनिया गांधींकडे हंगामी अध्यक्ष

काँग्रेस नेते दिग्विजय सिंह यांना मध्य प्रदेशच्या भोपाळ मतदारसंघाच साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर यांच्याकडून पराभव स्वीकाराला लागला. नरेंद्र मोदींवर आरोप करीत भाजप सोडून काँग्रेसमध्ये गेलेल्या अभिनेते शत्रुघ्न सिन्हा यांना पटनासाहिब मतदारसंघातून केंद्रीय मंत्री रवीशंकर प्रसाद यांनी हरवले. तर दुसरीकडे निवडणुकीपूर्वी समाजवादी पार्टीतून भाजपमध्ये आलेल्या जयाप्रदा यांना सपाच्या आजम खान यांनी पराभूत केले. मध्य प्रदेशच्या गुणा मतदारसंघात काँग्रेसच्या ज्योतिरादित्य शिंदे यांचा भाजपच्या कृष्णा पाल सिंह यांनी पराभव केला.

बाजपने २०१४ निवडणूक खर्चातही प्रचंड वाढ झाली होती. २०१४ च्या निवडणुकीत ३० हजार कोटी रुपये खर्च झाले होते तर २०१९ मध्ये ६० हजार कोटींच्या आसपास खर्चाची रक्कम गेली होती. २०१९ ची निवडणूक आतापर्यंतची सर्वात महाग निवडणूक ठरली आहे. केवळ देशातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील ही महागडी निवडणूक झाल्याचे सीएमएसच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. एका मताला जवळ जवळ ७०० रुपये खर्च आल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले. या निवडणुकीत भाजपने १२६४ कोटी रुपये तर काँग्रेसने ८२० कोटी रुपये खर्च केल्याची माहिती या दोन्ही पक्षांनी निवडणूक आयोगाला दिली.

# इम्रान खान यांचा आरोप, ''पाकिस्तान लष्कराकडून माझी पत्नी बुशरा बीबीवर विषप्रयोग





**दिल्ली :** पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांनी पाकिस्तानच्या लष्करावर एक गंभीर आरोप केला आहे. त्यांनी केलेल्या या आरोपाची सोशल मीडियावर चर्चा आहे. माझ्या पत्नीचं काही बरं वाईट झालं तर ती जबाबदारी पाकिस्तान लष्कर प्रमुखांची असेल असं इम्रान खान यांनी म्हटलं आहे. तोशखान भ्रष्टाचार प्रकरणाच्या सुनावणीच्या दरम्यान न्यायाधीश नासिर जावेद यांच्यासमोर इम्रान खान यांनी हा दावा केला आहे.

काय म्हटलं आहे इम्रान खान यांनी?

पाकिस्तानच्या तेहरीक ए इन्साफ पक्षाचे नेते इम्रान खान यांना आदियाला तुरुंगात ठेवण्यात आलं आहे. बुशरा बीबी यांना विष देण्यात आलं. यामागे कुणाचा हात आहे ते मला माहीत आहे असं इम्रान खान यांनी म्हटलं आहे. इम्रान खान म्हणाले बुशरा बीबी यांच्या जिवाला काही झालं तर पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल असीम मुनीर यांना जबाबदार धरण्यात यावं. कारण एका गुप्तचर संस्थेचे सदस्य त्यांच्या इस्लामाबादमधील बनी गाला निवासस्थान आणि रावळपिंडी येथील अदियाला तुरुंगात सर्वकाही नियंत्रित करत होते. शौकत खानम रुग्णालयाचे डॉ. असीम यांनी बुशराची वैद्यकीय तपासणी करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती इम्रान खान यांनी न्यायालयाला केली आहे. यापूर्वी तपासलेल्या डॉक्टरांवर माझा आणि पक्षाचा विश्वास नसल्याचेही ते म्हणाले.

यानंतर न्यायालयाने त्यांना पत्नी बुशराच्या वैद्यकीय तपासणीबाबत सविस्तर अर्ज सादर करण्याचे निर्देश दिले. सुनावणीनंतर बोलताना बुशरा बीबी म्हणाल्या की, मी पाकिस्तानमधील अमेरिकन एजंट असल्याच्या अफवा पक्षात पसरत होत्या. माझ्या जेवणात टॉयलेट क्लिनर मिसळले जात होते. माझे डोळे सुजले आहेत, मला पोटात वेदना जाणवत आहे. अन्न आणि पाण्याची चव देखील कडू झाली आहे. आता या प्रकरणी लष्कराकडून काही म्हणणे मांडले जाणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. द प्रिंटने या विषयीचे वृत्त दिले आहे.

बुशरा यांना हार्पिक देण्यात आले असा दावा इम्रान खान यांनी केला आहे. त्यावर पाकिस्तानचे नागरिक विचारत आहेत की लाल हार्पिक दिले की निळे हार्पिक दिले ते देखील सांगा. सोशल मीडियावर हे प्रश्न विचारले जात आहेत.

# समानतेच्या मुद्यावर भारताला या पृथ्वीतलावरील कोणाच्याही उपदेशाची गरज नाही : उपराष्ट्रपतींचे प्रतिपादन



**नवी दिल्ली :** समानतेच्या मुद्यावर या पृथ्वीतलावरील कोणाच्याही उपदेशाची भारताला गरज नाही, कारण आम्ही त्यावर नेहमीच विश्वास ठेवला आहे,असे प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज केले. ''काही देशांमध्ये अद्याप महिला राष्ट्रपती नाहीत , त्याउलट ब्रिटनच्या खूप आधी आपल्याकडे महिला पंतप्रधान होत्या. इतर देशांतील सर्वोच्च न्यायालयांतून २०० वर्षात महिला न्यायाधीश झाल्या नाहीत पण आपल्याकडे आहेत, असे अधोरेखित करत अनेक देशांनी आपल्या अंतर्मनात डोकावून पहायला हवे असे परखडपणे सांगितले.

नागरिकत्व दुरुस्ती कायद्याबद्दल खोट्या गोष्टी आणि चुकीच्या माहितीविरोधात सावधगिरी बाळगण्यास सांगताना धनखड म्हणाले की सीएए कायदा कोणत्याही भारतीय नागरिकाचे नागरिकत्व हिरावून घेण्याचा प्रयत्न करत नाही किंवा पूर्वीप्रमाणे भारतीय नागरिकत्वासाठी अर्ज करण्यापासून कोणालाही वंचित ठेवत नाही. सीएए शेजारील देशांतील अल्पसंख्याकांसाठी भारतीय नागरिकत्व मिळवणे सुलभ करते,असे नमूद करत, '' शेजारच्या राष्ट्रातील लोकांच्या धार्मिकतेप्रति बांधिलकीमुळे झालेल्या छळामुळे आम्हाला सहानुभूती वाटण्याऐवजी भेदभाव कसा करता येईल?'' असा प्रश्न उपराष्ट्रपतींनी उपस्थित केला.

३१ डिसेंबर २०१४ रोजी किंवा त्यापूर्वी भारतात आलेल्यांना सीएए लागू होते असे नमूद करत देशात येण्यासाठी त्यांना आमंत्रण दिलेले नाही यावर उपराष्ट्रपतींनी भर दिला. ''आपल्याला या खोट्या कथा खोडून काढायच्या आहेत. हे अज्ञानातून आलेले नाही तर देशाला संपवण्याची रणनीती आखणाऱ्यांचा हा डाव आहे,''असा इशारा देत त्यांनी सर्वांना सावध केले.

मसुरी येथील लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासकीय अकादमी येथे आज २०२३ च्या भारतीय प्रशासकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या व्यावसायिक प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या पहिल्या टप्प्याच्या समारोपावेळी संबोधित करताना ''आपल्या गौरवशाली आणि मजबूत घटनात्मक संस्थांना कलंकित करण्याच्या उद्देशाने,वास्तविकदृष्ट्या असमर्थनीय राष्ट्रविरोधी कथनाचा निषेध करण्याचे आवाहन उपराष्ट्रपतींनी केले. लोक तुमच्याकडे आदर्श म्हणून पाहतात.''तुम्हाला असे काम करून दाखवायचे आहे ज्याचे अनुकरण केले जाईल, प्रेरणादायी असेल आणि युवकांना प्रेरित करेल आणि प्रभावी क्षमता दाखवत ज्येष्ठांकडून शाबासकीची थाप मिळवेल अशा कृतींचे उदाहरण तुम्हाला समोर दाखवून द्यावे लागेल,असे आवाहन उपराष्ट्रपतींनी प्रशासकीय सेवेतील प्रशिक्षणार्थींना केले.

आपल्या सुसंस्कृत मूल्यांचे मार्गदर्शक तत्त्व म्हणून वर्णन करून, उपराष्ट्रपतींनी तरुण अधिकाऱ्यांना ''सेवाभाव आणि समानुभूती - सेवा आणि सहानुभूती या भावनेने काम करण्यास सांगितले.''

# 'लॉटरी किंग' सँटियागो मार्टिनला दिलासा

## पीएमएलए न्यायालयात सुरु असलेल्या कार्यवाहीवर सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

**नवी दिल्ली** 'लॉटरी किंग' सँटियागो मार्टिन विरुद्ध मनी लॉन्ड्रिंग प्रकरणामध्ये केरळच्या पीएमएलए न्यायालयात सुरु असलेल्या कार्यवाहीवर सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी (१० एप्रिल) स्थगिती दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून सँटियागो मार्टिनच्या विरुद्ध केरळच्या पीएमएलए न्यायालयात मनी लॉन्ड्रिंग प्रकरणाचा खटला सुरु होता. आता या खटल्याला स्थगिती देत सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणासंदर्भात ईडीचे म्हणणे काय? त्याची माहिती मागवली आहे.

सँटियागो मार्टिनच्यावतीने ज्येष्ठ वकील आदित्य सोंधी आणि वकील रोहिणी मुसा यांनी सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडली. यावेळी दाखल याचिकेत काय आहे? यासंदर्भात ते म्हणाले, पीएमएलए न्यायालयात एखादा



खटला हस्तांतरित केल्यानंतर पूर्व-निर्धारित किंवा अनुसूचित गुन्ह्यांची प्राथमिक सुनावणी प्राधान्याने घ्यायला हवी का? असा प्रश्न याचिकेत उपस्थित करण्यात आला. यावर न्यायमूर्ती एएस ओका आणि उज्ज्वल भुईया यांनी नोटीस बजावली.

दरम्यान, इलेक्टोरल बाँड्सची माहिती सार्वत्रिक झाल्यानंतर यामध्ये अनेक मोठ्या कंपन्यांचे नाव समोर आले होते. यामध्ये सँटियागो मार्टिन यांचाही सहभाग होता. सँटियागो मार्टिनची कंपनी फ्यूचर गेमिंग अँड हॉटेल सर्व्हिसेस या कंपनीने तब्बल १३०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे निवडणूक रोखे खरेदी केले होते.

मनी लॉंड्रिंगच्याच्या संदर्भात मालमत्तांवर छापे

सँटियागो मार्टिनवर २०११ मध्ये तामिळनाडू आणि कर्नाटक पोलिसांनी लॉटरी व्यवसाचा संशयावरून छापा टाकला होता. तसेच २०१३ मध्ये केरळ पोलिसांनी बेकायदेशीर लॉटरी व्यवसायाचा तपास करत सँटियागो मार्टिनच्या मालमत्तांचा शोध घेतला होता. यानंतर २०१५ मध्ये करचोरी केल्याच्या आरोपावून आयकर विभागाने केरळ, तामिळनाडू कर्नाटकमध्ये सँटियागो मार्टिनच्या कार्यालयांवर आणि घरांवर छापे टाकले होते. यानंतर सँटियागो मार्टिनवर शेवटची कारवाई मे २०२३ मध्ये झाली होती. त्यावेळी ईडीने मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी ४५७ कोटी रुपये जप्त केले होते.

# काँग्रेसमध्ये जीव घुसमटणाऱ्या प्रवक्त्यांची भाजपमध्ये पोपटपंची !

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत तगडे मुद्दे मांडून विरोधकांची कोंडी करेल असा प्रवक्ता काँग्रेसकडे राहिलेला नाही. वृत्तवाहिन्या गाजवणारे गौरव वल्लभ यांनी देखील काँग्रेसच्या नेतृत्वाला वैतागून भाजपमध्ये प्रवेश केला आहे. गेल्या काही वर्षामध्ये जैवीर शेरगील, शेहजाद पुनावाला, रिटा बहुगुणा-जोशी, टॉम वडक्कन असे अनेक काँग्रेस प्रवक्ते आता भाजपची वकिली करू लागले आहेत. कधीकाळी आम आदमी पक्षासाठी (आप) आक्रमक भूमिका घेणाऱ्या शाजिया इल्मी आता भाजपच्या प्रवक्त्या बनल्या असून त्या 'आप'विरोधात अधूनमधून तोफ डागताना दिसतात.

अडचणीच्या परिस्थितीत पक्षाची बाजू लोकांसमोर मांडणे, ती पटवून देणे आणि विरोधकांचे आरोप खोडून काढण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम राष्ट्रीय प्रवक्ते करत असतात. त्यासाठी कुठल्याही पक्षाचा राष्ट्रीय प्रवक्ता वैचारिकदृष्ट्या भक्कम असावा लागतो, त्याची पक्षावर निष्ठा असावी लागते.

पण, काँग्रेसच्या प्रवक्त्यांकडे वैचारिक स्पष्टता आणि निष्ठा दोन्ही नसल्याचे वारंवार पाहायला मिळाले आहे. आता तर पक्षाचे माजी अध्यक्ष राहुल गांधी हेच एकमेव 'राष्ट्रीय प्रवक्ता' उरले आहेत. बाकी प्रवक्ते एकामागून एक पक्ष सोडून गेले आहेत किंवा शिल्लक उरलेले वादात सापडलेले आहेत.

राम मंदिरापासून तिहेरी तलाक, महिला आरक्षण अशा सगळ्या विषयांवर भाजपच्या वतीने तलवारबाजी करणारे शहजाद पुनावाला मूळचे काँग्रेसचे. त्यांनी २०१७ मध्ये भाजपमध्ये प्रवेश केला, तिथे 'मुस्लिम प्रवक्ता' म्हणून संधीही मिळाली. आता ते भाजपच्या प्रमुख राष्ट्रीय प्रवक्त्यांपैकी एक आहेत. जैवीर शेरगील यांनी कित्येक वर्षे काँग्रेसचे प्रवक्तेपण सांभाळले. ते २०२२ मध्ये भाजपमध्ये गेले. त्यांचे अस्तित्व तिथेही जाणवत नाही. प्रियंका चतुर्वेदी यांनी २०१९ मध्ये काँग्रेसला रामराम केला, चतुर्वेदी मुंबईच्या असल्यामुळे त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यांना लगेच राज्यसभेची खासदारकीही मिळाली. महिलांच्या मुद्द्यावर प्रखरपणे त्या काँग्रेसची बाजू मांडत असत.

या सगळ्या प्रवक्त्यांनी पक्ष बदलण्याआधी २०१६ मध्ये काळाची पावले ओळखत रिटा बहुगुणा-जोशींनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली. त्यांना भाजपने २०१९ मध्ये लोकसभेची उमेदवारीही दिली होती पण, त्यांचा पराभव झाला. आता रिटा बहुगुणा-जोशींना भाजपमध्येही फारसे महत्त्व उरलेले नाही.

काँग्रेस सोडून गेलेल्या बहुतांश प्रवक्त्यांचा गांधी कुटुंबातील सदस्यांच्या व त्यांच्या अवतीभवती असलेल्या कोंडाळ्यांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप होता. राहुल गांधी भेटत नसल्याची काँग्रेसमधील अनेकांची तक्रार होती, बंडखोर 'जी-२३' गटानेही राहुल गांधींच्या कार्यपद्धतीवर टीका केली होती. काँग्रेस फक्त गांधी कुटुंबाच्या भल्यासाठी चालवली जात असल्याचा आरोप शहजाद पुनावाला यांनी अनेकदा केलेला आहे. पक्षातील नेतृत्वाशी थेट संवाद साधता येत नसेल तर पक्षात कशासाठी राहायचे असे पुनावालाच नव्हे इतरांचेही म्हणणे होते.

पक्षामध्ये वैयक्तिक राजकीय विकासाला संधी मिळत नसल्याचे प्रियंका चतुर्वेदी यांचे म्हणणे होते. प्रियंका चतुर्वेदी यांनी काँग्रेसकडे राज्यसभेची खासदारकी मागितल्याची चर्चा रंगली होती पण, काँग्रेसने त्यांना वाटाण्याच्या अक्षता दिल्यामुळे त्यांनी शिवसेनेमधून खासदारकी मिळवली. त्या फारशा मराठीतून बोलत नाहीत पण, शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या वतीने मराठी मुद्दा राज्यसभेत हिरीरीने मांडताना दिसतात.

गौरव वल्लभ यांना काँग्रेसने राजस्थान विधानसभा निवडणुकीत उदयपूर मतदारसंघातून उमेदवारीही दिली होती तरीही ते भाजपमध्ये गेले आहेत. सनातन, राम मंदिर असे भाजपचे हुकमी मुद्दे त्यांना आपलेसे वाटू लागल्याने त्यांनी काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतला. सनातनविरोधात काँग्रेसमध्ये बोलू दिले जात नाही अशी त्यांनी तक्रार होती. मोदींच्या आर्थिक धोरणाची चिरफाड करणाऱ्या वल्लभ यांच्यासाठी अर्थकारणापेक्षा सनातन धर्म व राम अधिक महत्त्वाचा ठरला आहे. रिटा बहुगुणा-जोशी यांच्यासारख्या प्रवक्त्यांनीही काँग्रेसमधील अंतर्गत कार्यपद्धतीवर नाराज होत भाजपमध्ये प्रवेश केला होता.

काँग्रेस सोडून भाजपमध्ये गेलेले हे प्रवक्ते फक्त प्रवक्तेच राहिले आहेत. अगदी शहजाद पुनावाला यांनादेखील पक्षाने राज्यसभेची खासदारकी वा पक्षात मोठे पद दिलेले नाही. बहुगुणा-जोशी, शेरगील आदींची उपयुक्तता संपली असावी असे चित्र भाजपमध्ये पाहायला मिळते.

'आप'मधून भाजपमध्ये आलेल्या शाजिया इल्मी यांना देखील पक्षाने प्रमुख प्रवक्त्यांच्या रांगेत बसवलेले नाही. 'आप'च्या संदर्भातील वादावर देखील भाजपच्या वतीने हरदीपसिंह पुरी वा अन्य नेते बोलतात, त्यानंतर एखाद-दोन मिनिटे इल्मींना बोलू दिले जाते. एका पत्रकार परिषदेला तर शेजारी बसलेल्या इल्मींना पुरी विसरून गेले होते. इल्मींनी स्वत:हून बोलण्यास सुरुवात केल्यावर पुरींना इल्मींची आठवण झाली होती.

# बाबा रामदेव यांचा माफीनामा सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला



दिशाभूल जाहिरातीच्या प्रकरणावरून पतंजली आयुर्वेदाचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण आणि बाबा रामदेव यांना सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा फटकारले आहे. दिशाभूल जाहिरातीच्या प्रकरणात बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांचा दुसरा माफीनामा सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला. या प्रकरणाची बुधवारी (१० एप्रिल) न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती अमानतुल्ला यांच्या खंडपीठासमोर पतंजलीची बाजू वकील विपिन सांघी आणि मुकुल रोहतगी यांनी मांडली.

यावेळी न्यायलयाने म्हटले की, तुम्ही न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केले असून कारवाईला सामोरे जा. याआधी २ एप्रिलला झालेल्या सुनावणीवेळी पतंजलीच्यावतीने माफीनामा सादर करण्यात आला होता. यावरुन न्यायालयाने पतंजलीला फटकारले होते. तसेच सुनावणीची पुढील तारीख दिली होती. यानुसार सुनावणी पार पडली. मात्र, या सुनावणीच्या आधीच एक दिवस म्हणजे ९ एप्रिलला पतंजली आयुर्वेदाचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण आणि बाबा रामदेव यांनी पुन्हा प्रतिज्ञापत्र सादर करत दुसऱ्यांदा माफी मागितली होती. मात्र, हा माफीनामा न्यायालयाने फेटाळला आहे.